# उपविधी

(सूचना :- या उपविधीत केलेल्या **'अधिनियमाचा' व 'नियमांचा'** उल्लेख हा अनुक्रमे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 व त्यान्वये केलेले नियम 1961 यांचा उल्लेख आहे, असे समजावे.)

## प्रकरण एक - प्रारंभिक

1. संस्थेचे नांव ________________ पाणी पुरवठा संस्था मर्यादित असे आहे व संस्थेचा नोंदविलेला पत्ता________________________ असा आहे. तिचा नोंदणी क्र. ....................................................दि. ..................... असा आहे. पत्त्यातील होणारा बदल अधिनियमातील कलम 37 व नियम 31 मधील तरतुदीनुसार निबंधकांना कळविला जाईल व निबंधकाच्या मंजुरीनंतरच तो बदल नोंदविला आहे असे समजण्यात येईल.

2. संस्थेचे कार्यक्षेत्र ________ या गावांमधील संस्थेच्या पाणी पुरवठा योजनेच्या कमांड एरियातील ज्यांच्या जमिनींना योजनेप्रमाणे पाणी पुरवठा होऊ शकेल. त्यांच्यापुरतेच मर्यादित राहील.

3. सदर संस्थेचे वर्गीकरण "**उध्दरण सिंचन संस्था / उपसा सिंचन संस्था**" असे आहे.

4. संस्थेचे सहकारी वर्ष 1 एप्रिल रोजी सुरू होईल व पुढील वर्ष 31 मार्च रोजी संपेल.

**5. संस्थेचे उद्देश :-**

(1) संस्थेच्या कार्यक्षेत्रातील विहीर/नदी/ओढे/नाले/बंधारे/धरणे/तळी यांचे पाणी पाईपलाईनव्दारे, कालव्याने व पाटाने पुरविणे.

(2) असे पाणी पुरविण्याकरिता नदी/नाले/ओढे इत्यादींना बंधारे बांधणे व त्यात पाणी साठविणे.

(3) संस्थेच्या कार्यक्षेत्रातील नदी/ओढे/नाले/तळी/विहीर इत्यादींचे पाणी साठविणे व ते वर उपसून पाईपलाईनव्दारे, कालव्याने व पाटाने पुरविणे.

टीप : 'पाणी पुरविणे' यात शेतीसाठी, तसेच जनावरांना, माणसांना पिण्याकरिता पाणी पुरविण्याचा समावेश केला आहे समजण्यात येईल.

(4) पाण्याचा पुरवठा करण्याकरिता नदी/ ओढे /नाले /तळी /विहीरी यांच्यावरील इंजिने, यंत्रे, विजेच्या मोटारी, अगर अन्य यंत्रसामुग्री विकत अगर भाडयाने घेऊन बसविणे तसेच त्याकरिता लागणारे पंप, हत्यारे इत्यादी साधने विकत अगर भाडयाने घेणे.

(5) इंजिने, यंत्रे, विजेच्या मोटारी, यंत्रसामग्री, पंप, हत्यारे इत्यादी पाणीपुरवठयाकरिता लागणारी साधने विकत अगर भाडयाने घेऊन ती आपल्या गरजू सदस्यांना त्यांच्या जबाबदारीवर योग्य दराने विकत अगर भाडयाने देणे.

(6) संस्थेचे बंधारे, कालवे, पाट, इंजिने, यंत्रे, यंत्रसामग्री इ. जिंदगी सुस्थितीत ठेवणे आणि तिचे

संरक्षण करणे.

(7) संस्थेच्या पाणी पुरवठयाच्या कामाकरिता नवीन जादा जमिन विकत घेणे, दिर्घ मुदतीच्या पट्टयाने अगर भाडयाने घेणे अगर अन्य रीतीने मिळविणे.

टीप : {1} वरील 5 (1) ते (7) मध्ये नमूद केलेल्या कामाकरिता व साधनाकरिता तज्ज्ञांच्या मदतीने प्रथम जरूर त्या योजना तयार करून त्यांच्या अंदाजे खर्चाच्या पत्रकासह सर्वसाधारण सभेपुढे सादर केल्या जातील व सर्वसाधारण सभेच्या मंजूरीनंतरच त्या अंमलात आणल्या जातील.

टीप :{2} पाणी पुरवठा योजनेच्या कक्षेतील जमिनी,सध्या योजनेत सामील होणाऱ्या जमिनी, पाणी पुरवठयाची ठिकाणे, पाण्याचे कालवे व पाट इत्यादी तपशील दाखविणारा नकाशा या उपधीसोबत जोडला जाईल. योजनेतील जमिनी कमी जास्त होण्यामुळे अगर अन्य कारणाने तिच्यात होणारे बदल हे सर्वसाधारण सभेच्या मान्यतेने केले जातील.

8) संस्थेची जागा, जमिनी, यंत्रसामुग्री, इमारती इत्यादी जिंदगी संस्थेला तिची जरूरी नसल्यास योग्य किंमतीस विकता येईल. मात्र ती विकण्यापूर्वी सर्वसाधारण सभेची मान्यता घेतली जाईल.

9) पाणी पुरवठा नीट होण्याकरीता जमिनीची सुधारणा व त्यांचे एकत्रीकरण यास प्रोत्साहन देणे.

10) संस्थेच्या शेतीच्या कामाकरिता तज्ज्ञांचा सल्ला वेळोवेळी मिळविणे व तो सदस्यांना मिळवून देण्याची व त्यामध्ये नवीन आधुनिक शेती व पाणी पुरवठा पध्दतीविषयक ज्ञानाचा फैलाव करण्याची व्यवस्था करणे.

11) संस्थेला बंधारे बांधणे, विहिरी, कालवे अगर पाट खोदणे, बांधणे, चर खणणे याकरिता ; तसेच जागा, जमिन, मशिनरी, यंत्रे इत्यादी साधने घेण्याकरिता अगर तिच्या दैनंदिन गरजा भागविण्याकरिता, तसेच उपविधी क्रमांक 6 मध्ये नमूद केलेल्या कारणांसाठी जरूर पडल्यास संस्थेची सदस्यांची त्यांच्या संमतीने स्थावर अगर जंगम मिळकत तारण देऊन भांडवल जमविणे.

12) संस्थेकरिता व्यवस्थापक शेती व पाणी पुरवठा तज्ज्ञ व इतर कामगार नेमणे, त्यांचे नियंत्रण करणे व जरूरीनुसार त्यांना कमी करणे.

## प्रकरण दोन - भांडवल

### 6. *पुढील साधनांनी भांडवल जमा केले जाईल.*

(1) भागांच्या रूपाने : अ) सभासदांकडून ब) शासनाकडून क) इतर वित्तीय संस्था.

(2) ठेवींच्या रूपाने

(3) कर्जाच्या रूपाने

(4) देणग्यांच्या व अनुदानांच्या रूपाने

(5) प्रवेश फी च्या रूपाने

(6) पाणीपट्टीच्या उत्पन्नातून विकास निधी उभारून

(7) समिती ठरवील तेवढया रक्कमेच्या, मुदतीच्या व व्याजाच्या दराने नियम 35 प्रमाणे ठेवी व कर्जाच्या एकत्रित बोजाचे उल्लंघन होऊ न देता ठेवी व कर्जे स्विकारली जातील.

(8) वरील 2 व 3 या साधनांनी जमविण्याचे भांडवल हे संबंधित संस्थेचे निबंधक यांच्या पूर्व परवानगीशिवाय, भागांचे वसूल झालेले भांडवल, साठविलेला राखीव निधी व इमारत निधी यांच्या बेरजेतून साचलेले तोटे वजा जाता राहिलेल्या रक्कमेच्या दहा पटींहून जास्त असणार नाही.

(9) संस्थेचे भांडवल संस्थेच्या व्यवहारात गुंतलेले नसेल तेव्हा अधिनियम कलम 70 अन्वये ते गुंतविले जाईल.

## प्रकरण तीन - सभासदत्व

**7.** नियम 19 अन्वये घातलेल्या व खालील अटी पूर्ण केल्याखेरीज कोणाही व्यक्तीस संस्थेचे सभासद होता येणार नाही.

1) तो पूर्ण 18 वर्षे वयाचा व करार करण्यास पात्र असला पाहिजे.

2) संस्थेच्या पाणी पुरवठा योजनेच्या कक्षेत त्यांच्या मालकीची अगर लेखी कराराने खंडाची जमीन येत असली पाहिजे व संस्था पुरविल तेवढया पाण्याने ती भिजविण्याचे बंधन त्याने पत्करले पाहिजे व पाणीपुरवठा योजनेकरिता घ्यावयाच्या कर्जास आपल्या जमिनी तारण करून देण्याच्या परिशिष्ट ' 1 ' मधील नमुन्यात त्याने करार करून दिला पाहिजे.

3) तो चांगल्या वर्तणुकीचा असला पाहिजे.

4) त्याची पत चांगली असली पाहिजे.

5) संस्थेचे निबंधक यांनी ठरविलेल्या नमुन्यात त्याने सदस्यत्वाकरिता अर्ज दिला असला पाहिजे.

6) त्यांच्या मालकीच्या अगर लेखी कराराने घेतलेल्या खंडाच्या जमिनीमधून संस्थेला योजनेचा नकाशा व आराखडयाप्रमाणे चर काढणे, पाट काढणे, पाईप लाईन टाकणे अगर तत्सम कामे करण्यास त्यांनी या उपविधीच्या सोबत जोडलेल्या परिशिष्ट '1' मधील नमुन्यात करारपत्र लिहून दिले असले पाहिजे.

7) पाणी पुरवठयाबाबतचे संस्थेचे आदेश पाळण्याचे बंधन त्याने पत्करले पाहिजेत.

8) संस्थेच्या कमांड एरियातील ओढा, नाला अगर ज्या पाणी साठयावर योजना कार्यन्वित झालेली आहे त्यावर इलेक्ट्रीक मोटारपंप अगर ऑईल इंजिन किंवा अन्य प्रकारे कोणतेही साधन बसवून पिकास पाणी घेता येणार नाही. जर संस्थेच्या कमांड एरियामध्ये पाझर पाण्याव्दारे कोणत्याही पिकास पाणी घेतल्यास त्या पिकाची पाणीपट्टी विहित दराच्या निम्म्याने आकारणीचा अधिकार संस्थेस राहील.

9) त्याचा सदस्य होण्याबद्दलचा लेखी अर्ज संचालक मंडळ समितीने बहुमताने मंजूर केला असला पाहिजे.

10) त्याने 100/- रूपये प्रवेश फी दिली असली पाहिजे.

11) पाणीपुरवठा योजनेप्रमाणे त्याने किमान जितके भाग घ्यावयास पाहिजेत तितक्या भागासाठी पहिला हप्ता म्हणून व्यवस्थापक समितीने ठरवून दिलेली रक्कम भरली असली पाहिजे.

12) अधिनियम, नियम व उपविधी यातील अटी त्याने पुऱ्या केल्या असल्या पाहिजेत.

वरील क्रमांक 5 व 9 मधील अटी, संस्था नोंदणीसाठी केलेल्या मूळच्या अर्जावर ज्यांच्या सहया असतील त्यांना लागू असणार नाहीत.

13) संस्थेने कमांड एरियात शेतीस पाणी पुरवठयासाठी घातलेली कोणतीही पाईप लाईन, सिमेंट गटर्स अगर पाण्याचे पाट अगर अन्य कोणत्याही तयार केलेल्या योजना मोडता येणार नाहीत. अगर त्याची नासधूस करता येणार नाही. त्याचबरोबर संस्थेने बसविलेली कोणतीही मशिनरी, इंजिने वगैरेस नुकसान पोहोचविणारी कृत्ये केल्यास त्यास संस्थेच्या व्यवस्थापक समितीने ठरविलेला दंड द्यावा लागेल.

14) संस्थेचे उद्देश त्यास समजले असले पाहिजेत.

15) वीज पुरवठयाच्या अभावी अगर मशीनरीच्या नादुरूस्तीमुळे किंवा नदीतील पाण्याची पातळी (लेव्हल) कमी होऊन अपेक्षेप्रमाणे पाणी देता आले नाही तर पाणीपुरवठा चालू असलेल्या पिकाचे क्षेत्र (पिकास) नुकसान पोहोचल्यास अशा कोणत्याही नुकसानीबद्दल पाणी पुरवठा संस्थेस जबाबदार धरता येणार नाही.

16) संस्था नोंदणी होण्यापूर्वी जर विहीर काढलेली असेल तर संस्था स्थापन करण्यापूर्वी जेवढे क्षेत्र भिजत असेल तेवढेच क्षेत्र पाणीपट्टी आकारणीस सुटपात्र ठरेल. यापेक्षा जास्ती क्षेत्र संस्था सुरू झाल्यानंतर भिजू लागल्यास जादा भिजवल्या जाणाऱ्या पिकाची पाणीपट्टी विहित दराने निम्म्याने अगर साधारण सभेने मंजूर केलेल्या दराने पाणीपट्टी आकारणीचा अधिकार संस्थेस राहील.

8. ***'सहयोगी सदस्य'व 'नाममात्र सदस्य' म्हणून एखाद्या व्यक्तीस त्याच्या लेखी अर्जावरुन***

***कलम 24 मधील तरतूदीनुसार सदस्य करुन घेता येईल. मात्र त्याने उपविधी क्रमांक 7 मधील जरुर त्या अटी पूर्ण केल्या असल्या पाहिजेत. 'नाममात्र' सदस्यांचे संस्थेशी होणारे व्यवहार व संस्थेतील त्याचे अधिकार, अधिनियम कलमे अनुक्रमे क्रमांक 24 व 27(8) मधील तरतूदींना अनुसरुन मर्यादित स्वरुपाचे असतील; त्याहून जादा असणार नाहीत.***

9. मयत सदस्यांचे भाग अगर हितसंबंध वारसाहक्काने मिळविणारी अज्ञान अगर वेडसर व्यक्ती यांना अनुक्रमे त्याचे कायदेशीर प्रतिनिधी अगर पालक यांच्यामार्फत नियम, उपविधीनुसार यास सभासद करून घेण्यासंबंधी ठरविलेल्या कार्यपध्दतीनुसार नियम क्रमांक 20 प्रमाणे सभासद करून घेता येईल. आणि अधिनियम व नियमानुसार उपविधीत नमूद केलेल्या हक्काचा उपभोग घेता येईल व जबाबदाऱ्या स्वीकारता येतील.

10. उपविधी क्रमांक 7 मध्ये काहीही नमूद केले असले तरी राज्य शासन, केंद्र शासन, जिल्हा मध्यवर्ती अगर राज्य सहकारी बँकेला अगर भूविकास बँकेला या संस्थेचे सदस्य होता येईल.

11. एखाद्या अर्जदारास सभासदत्व नाकारल्यास निकालाच्या तारखेपासून ***पंधरा*** दिवसांच्या आत अगर सभासद होण्याकरिता केलेल्या अर्जाच्या तारखेपासून तीन महिन्यांच्या आत जी मुदत लवकरची असेल त्या मुदतीत अर्जदाराला निर्णय कळविला जाईल. अर्जदाराला कलम 23 मधील तरतूदींनुसार संस्थेच्या निबंधकाकडे या निर्णयाविरूध्द अपिल करता येईल.

12. सभासदांची जबाबदारी कलम 33 मधील तरतूदीस अधिन राहून त्याने घेतलेल्या भागांच्या रक्कमेइतकी राहील. शासकीय अगर बाहेरील कर्जाकरिता सभासदाने आपली जमीन तारण दिली असेल तर ते कर्ज फिटेपर्यंत त्याचा बोजा त्या जमिनीवर चालू राहील. मग त्याचे सभासदत्व चालू असो वा नसो.

13. कोणाही व्यक्तीस तिच्या जमिनीतून वाहणारा पाट अगर पाण्याचा प्रवाह मोडता किंवा नाहीसा करता येणार नाही. त्याने तो मोडल्यास अगर नाहीसा केल्यास अगर त्याने संस्थेशी लबाडी केल्यास अगर उपविधीचे उल्लंघन केल्यास अगर संस्थेच्या आदेशाचा भंग केल्यास त्याच्यावर समितीस योग्य वाटेल अशी कारवाई करता येईल. तो दुरूस्त करून त्याचा खर्च त्या सभासदाच्या खाती टाकून वसूल केला जाईल.

14. योजना पुरी होऊन प्रत्यक्ष पाणी पुरविण्याचे काम सुरू झाल्यापासून कोणाही सभासदाला त्याच्या सभासदत्वाचे दहा वर्षे पुरी झाल्यानंतरच संस्थेस एक महिन्यांची लेखी नोटीस देऊन आपले सभासदत्वाचा राजीनामा देता येईल. मात्र तसे करण्यापूर्वी त्याच्याकडे येणे असलेल्या रक्कमांची पूर्ण फेड झाली असली पाहिजे व जामीनकीच्या जबाबदारीतूनही तो संपूर्ण मुक्त झाला असला पाहिजे. नियम 21 मधील व उपविधीतील तरतूदी या राजीनामा मंजूर करताना विचारात घेतल्या जातील. ***मात्र एखाद्या सभासदाने दहा वर्षे पूर्ण होण्यापूर्वी राजीनामा दिला असल्यास कर्जाची स्विकारलेली जबाबदारीची फेड केल्याखेरीज आणि संबंधित बँकेने रिकन्व्हेन्स डीड केल्याखेरीज राजीनामा मंजूर करता येणार नाही.***

**15.** सर्वसाधारण सभेत हजर असणाऱ्या व मतांचा अधिकार असणाऱ्या सदस्यांच्या तीन चतुर्थांश सभासदांच्या मतांनी कोणत्याही सदस्यास पुढीलपैकी कोणत्याही कारणावरून संस्थेतून काढून टाकता येईल.

(1) जर तो आपली देणे बाकी सतत थकविणारा असेल.

(2) जर संचालक मंडळाच्या मते तो संस्थेच्या हिताविरूध्द काही कृत्य करीत असेल तर संस्था चालविण्यात वेळोवेळी अडथळे आणीत असेल.

(3) जर त्याने संस्थेला बदनाम केले असेल अगर खोटे सांगून मुद्दाम फसविले असेल.

(4) जर त्याचे दिवाळे निघाले असेल अगर तो कायद्याने लायक नसेल तर.

(5) त्याला सभासद असताना फौजदारी गुन्हयाबद्दल शिक्षा झाली असेल. मात्र शिक्षा होऊन पाच वर्षे झाल्यावर त्याला या कारणावरून काढून टाक ता येणार नाही.

(6) जर तो आपली मालकीची अगर खंडाची जमीन संस्थेने तिच्या कामास मागणी करूनही तिला देत नसेल, अगर ती देण्याचा परिशिष्ट ' 1 ' मधील नमुन्यात करार करून देत नसेल अगर केलेला करार पाळीत नसेल अगर संस्थेच्याबाहेरील व शासकीय कर्जाकरीता आपल्या जमिनी तारण देत नसेल अगर त्याबाबत करारपत्र करून देत नसेल.

***15अ. क्रियाशील सभासद - खालील तीन अटी पूर्ण करणा-या सभासदांना क्रियाशील सभासद म्हणून गणले जाईल. 1) मागील सलग पाच वर्षाच्या कालावधीमध्ये किमान दोन वेळा पाणी वापर करणे. 2) मागील सलग पाच वर्षाच्या कालावधीमधील किमान एका सर्वसाधारण सभेस उपस्थित राहणे. 3) पाणीपट्टी थकीत नसणे. दरवर्षी सर्वसाधारण सभेत क्रियाशील सभासदांची यादी प्रसिध्द केली जाईल. निवडणूकीवेळी अक्रियाशील असणा-या सभासदांना मतदानाचा अधिकार असणार नाही.***

**16.** कोणत्याही सदस्यास संस्थेतून काढून टाकताना अधिनियम कलम 35 व नियम 28 व 29 मधील तरतूदी विचारात घेतल्या जातील व त्यात नमूद केलेल्या कार्यरीतीचा अवलंब केला जाईल. काढून टाकलेल्या सभासदास या कलमातील तरतूदीनुसार पुन्हा सदस्य करता येईल.

**17.** खालील कारणांमुळे एखाद्याचे सभासदत्व बंद होईल.

(1) त्याने सभासदत्वाचा दिलेला राजीनामा मंजूर झाल्यास.

(2) त्याच्या नावावरील सर्व भाग अगर हितसंबंध दुसऱ्याच्या नावावर हस्तांतरीत झाल्यास.

(3) तो मयत झाला असल्यास.

(4) त्यास संस्थेतून काढून टाकले असल्यास.

(5) त्याला कायमचे वेड लागले असल्यास.

(6) योजनेखाली त्याची भिजणारी सर्व जमीन त्याने वर्ग केल्यास.

18. अ) कलम 26, नियम व उपविधी यात ठरविलेली रक्कम संस्थेत भरल्याशिवाय कोणाही व्यक्तीस सभासदत्वाचे हक्क बजावता येणार नाहीत.

ब) सभासदाची जमीन गहाण घेणारी व्यक्ती, त्याच्या जमिनीवर मालकीची किंवा लागवडीची किंवा कुळाचा हक्क असणारी व्यक्ती किंवा मयत सदस्याचा वारस किंवा प्रतिनिधी हे संस्थेचे सभासदाकडून येणे असलेल्या सर्व रक्कमाबद्दल जबाबदार राहतील.

19. ***संस्थेच्या सभासदांस त्याने संस्थेशी केलेल्या व्यवहारासंबंधीची कागदपत्रे, लेखे व पुस्तके अद्यावत नोंदीसह त्या सभासदाने लेखी अर्ज दिलेनंतर कलम 32 अन्वये त्यास संस्थेच्या कार्यालयीन वेळेत ते पाहता येतील किंवा मागणीप्रमाणे प्रती मिळतील.***

## प्रकरण चार - भागभांडवल

20. प्रत्येक भागाची दर्शनी किंमत रू. 100/- राहील. अधिकृत भागभांडवलाची कमाल मर्यादा रू. _____राहील. तसेच एकूण भागांची संख्या _________ राहील.

21. संस्थेच्या एकूण भागाच्या 1/5 भागापेक्षा किंवा जास्तीत जास्त वीस हजार रूपयांपेक्षा जास्त किंमतीचे भाग कोणाही सभासदास घेता येणार नाहीत अगर त्यावर हक्क सांगता येणार नाही.

22. सभासदाने भागाकरिता लेखी अर्ज दिला पाहिजे. संचालक मंडळाने अशा अर्जाचा निकाल केला पाहिजे.

23. प्रत्येक सभासदाच्या भिजणाऱ्या क्षेत्राच्या दर हेक्टरास योजनेप्रमाणे संचालक मंडळाने ठरवून दिलेल्या प्रमाणावर कमीत कमी भाग प्रत्येक सभासदाच्या नावावर असले पाहिजेत.

24. एकाच तारखेस विकत घेतलेल्या प्रत्येक भागाबद्दल निराळा क्रमांक असलेले भागपत्र दिले जाईल अथवा एकापेक्षा जास्त भाग घेतले असल्यास त्या सर्व भागाबद्दल निरनिराळे क्रमांक देऊन भागांचे एकत्रित एकच भागपत्र दिले जाईल.

25. भागाचे हस्तांतरण कलम 29, 30 व नियम 24 ते 26 मधील तरतूदीनुसार केले जाईल.

26. उपविधीमधील तरतूदींना अधिन राहून कोणाही सभासदास संस्थेमध्ये कमीत कमी एक वर्षभर भाग धारण केल्यावर संचालक मंडळाच्या मंजूरीने दुसऱ्या सभासदांस अगर संचालक मंडळाने ज्याचा अर्ज मंजूर केला असेल अशा व्यक्तींच्या नांवे आपले भाग अगर हितसंबंध हस्तांतरीत करता येतील. ज्यांच्या नांवे भाग हस्तांतरीत केला त्यांचे नांव भागाच्या हस्तांतरण नोंदणी नोंदवहीत दाखल केल्याखेरीज व हस्तांतरण करणाऱ्याने आपली संस्थेची देणी भागविल्याखेरीज भागाचे हस्तांतर पूर्ण होणार नाही.

27. कोणाही सभासदास आपल्या सहीचा लेख संस्थेजवळ ठेवून अगर त्या कामासाठी

ठेवलेल्या कोणत्याही पुस्तकात निवेदन नमूद करून संस्थेची पगारी अधिकारी व्यक्तीखेरीज करून इतर कोणत्याही व्यक्तींची नियम 25 मधील तरतूदीनुसार मरणानंतर संस्थेस असणाऱ्या आपल्या भागाचे अगर हितसंबंधाचे वारसदार म्हणून नेमणूक करता येईल अगर केलेली नेमणूक परत घेता येईल अगर तिच्यात बदल करता येईल. अशा पहिल्या नेमणुकीकरिता फी आकारली जाणार नाही.

**28.** एखादा सदस्य मयत झाल्यानंतर त्याचे भाग अगर हितसंबंध त्याने नेमलेल्या वारसदाराच्या नावे वर्ग केले जातील. असा वारसदार नेमला नसेल तर त्याच्या भाग अगर हितसंबंध अधिनियमन कलम 30 व नियम 25 मधील तरतूदीनुसार त्याचे वरिष्ठ वारसाच्या अगर कायदेशीर प्रतिनिधीच्या नांवे हस्तांतरीत केले जातील. मात्र हस्तांतरण करण्यापूर्वी त्या नेमलेल्या वारसास अगर कायदेशीर प्रतिनिधीस संस्थेचे सदस्य् करून घेतले जाईल. त्याकरिता संस्थेने ठरविलेल्या नमुन्यात त्याने अर्ज केला पाहिजे. सदस्यत्वाकरिता त्याला पुन्हा भाग विकत घेण्याची जरूरी नाही. मयताच्या वारसास सदस्य करून घेणे व त्याच्या नावावर भाग हस्तांतरीत करणे या दोन्ही बाबी एका मागून एक लगेच केल्या पाहिजेत.

**29 अ)** एखादा सदस्य मयत झाल्यानंतर त्याच्या खात्यात असलेल्या भागाच्या अगर हितसंबधाच्या रक्कमेतून संस्थेस त्याच्याकडून येणे असेल ते वजा करून राहिलेली बाकी, त्याने नेमून दिलेल्या वारसदारास अथवा वारसदार नेमला नसेल तर समितीच्यामते मयताचा जो कोणी योग्य वारस अगर कायदेशीर प्रतिनिधी असेल त्यांच्याकडून योग्य त्या प्रमाणात नुकसान भरपाईचा रोखा (A deed of Indeminity) लिहून घेऊन त्याने मागणी केल्यापासून सहा महिन्यांच्या आत अधिनियम कलम क्रमांक 30(3) व नियम क्रमांक 21 मधील तरतूदीनुसार दिली जातील. मयत सदस्यांची मुदतीची ठेव असल्यास ती मुदत संपण्यापूर्वी याप्रमाणे परत करता येणार नाही.

ब) सदस्यातून कमी झालेल्या व्यक्तीस ती कमी झाल्याच्या तारखेपासून एक वर्षाच्या आत त्याच्या भागाची रक्कम त्याला परत दिली जाईल. मात्र त्याच्याकडे येणे असलेल्या रक्कमा त्या भागांच्या रक्कमातून कापून घेतल्या जातील. तसेच कोणत्याही वर्षात परत करायचे भागभांडवल हे त्या लगत पूर्वीच्या 31 मार्च रोजी असलेल्या संस्थेच्या एकूण भांडवलाच्या 10 टक्क्यापेक्षा जास्त असता कामा नये.

टीप : 1) उपविधी क्रमांक 29 (अ) व (ब) च्या कारणासाठी भागाची रक्कम परत करताना, भागाची किंमत नियम क्रमांक 23 मधील तरतूदींना अनुसरून केली जाईल व भागाची रक्कम देताना तीच विचारात घेतली जाईल.

टीप : 2) मात्र प्रत्यक्ष पाणीपुरवठयाचे काम सुरू होऊन 10 वर्षे पुरी होईपर्यंत उपविधी क्रमांक 29(अ) व (ब) मध्ये निर्दिष्ट केलेली रक्कम परत करता येणार नाही. पाणी पुरवठा संस्थेची

योजना आर्थिकदृष्ट्या धोक्यात येऊ नये म्हणून ही तरतूद करण्यात आली आहे. ***मात्र नामनिर्देशित व्यक्ती सभासद होत असल्यास त्या भारांसहीत त्यांस सभासद करुन घेता येईल.***

क) संस्थेने जर सरकारी अगर पैसे पुरविणाऱ्या सहकारी बँकेचे कर्ज घेतले असेल तर अनुक्रमे निबंधक अगर अशी बँक यांच्या आगाऊ संमतीशिवाय संस्थेस कोणत्याही भागाची रक्कम परत करता येणार नाही.

## प्रकरण पाच - सर्वसाधारण सभा

30. संस्थेच्या सदस्यांच्या सर्वसाधारण सभेकडे संस्थेची सर्वोच्च सत्ता राहील. पण ती सत्ता अधिनियम, नियम व उपविधी यातील तरतूदींना अधिन राहील.

31. संस्थेची पहिली सर्वसाधारण सभा नियम 59 मधील तरतूदीनुसार भरविली जाईल. तिच्यात त्याच तरतूदीनुसार कामे केली जातील.

32. प्रत्येक वर्षी 31 मार्च नंतर ***30 सप्टेंबरच्या*** आत वार्षिक सर्वसाधारण सभा बोलाविली जाईल व त्याच तरतूदीनुसार त्या वर्षाची, नियम क्रमांक 62 अन्वये 'न' नमुन्यात तयार केलेली नफा, तोटा व ताळेबंद पत्रके, तसेच समितीचे वार्षिक प्रतिवृत्त व लेखापरीक्षण प्रतिवृत्त सर्वसाधारण सभेपुढे मंजूरीकरिता ठेवले जातील.

33. सर्वसाधारण सभेने करावयाच्या कामात खालील कामांचा समावेश होईल.

1) संस्थेच्या मागील वर्षाच्या कामाचा कलम 75 मधील तरतूदीनुसार तयार केलेला अहवाल व नियम 61 व 62 मधील तरतूदीनुसार तयार केलेली त्या सालची जमा व खर्च नफा व तोटा आणि जिंदगी व कर्जे दाखविणारी पत्रके समितीकडून घेणे व ती नफ्याच्या विभागणीसह मंजूर करणे अगर त्यात जरूर वाटतील त्या दुरूस्त्या करून मंजूर करणे.

2) उपविधी क्रमांक 3 मधील मर्यादेस अधिन राहून पुढील वर्षाकरिता उभारावयाच्या बाहेरील कर्जाच्या मर्यादा ठरविणे व योजनेकरिता वेळोवेळी सदस्याकडून उभारावयाच्या भांडवलाविषयी व वसूल करावयाच्या रक्कमाविषयी विचार करणे.

3अ) संस्थेच्या लेख्यांची दर तिमाहीस लेखापरीक्षण करण्याकरिता स्थानिक लेखापरीक्षकांची नेमणूक करणे व त्यांचा मेहनताना ठरविणे.

ब) संस्थेची लेखापरीक्षा यादी, नियम 73 मधील तरतूदीनुसार समितीने तिच्यावर केलेले दोष-दुरूस्त प्रतिवृत्त (रिपोर्ट) तसेच सहकार विभागाकडून व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडून आलेला पत्रव्यवहार यांचा विचार करणे.

4) उपविधी क्रमांक 15 प्रमाणे सदस्यांना संस्थेतून काढून टाकण्याच्या कामी करावयाच्या कारवाईचा विचार करणे.

5) पाणीपुरवठयाच्या योजनेत व तिच्या भिजवावयाच्या क्षेत्रात जरूरीप्रमाणे करावयाचे बदल अगर करावयाची वाढ याबद्दल विचारविनिमय करून तांत्रिक सल्ल्याने निर्णय घेणे.

6) पाणी पुरवठयासंबंधीचे धोरण आखणे, पाणी पुरवठयाचे दर व पाणी देण्याच्या पाळया ठरविणे व तदनुषंगिक कामाचा विचार करणे.

7) समितीच्या एका अगर अधिक सदस्यांना त्यांच्या कामाच्या मुदतीत त्यांच्या भरीव गैरप्रकारामुळे सर्वसाधारण सभेत हजर असणाऱ्या व मतदान करणाऱ्या 2/3 सदस्यांच्या मतांनी समितीमधून कमी करणे.

8) समिती व्यवस्थापक अगर इंजिन अगर मोटार ड्रायव्हर, तसेच शेतकी व पाणीपुरवठा तज्ज्ञांच्या केलेल्या नेमणुका कायम करणे, त्यांना त्यांच्या चुकांबद्दल दंड करणे अगर त्यांना कामावरून कायमचे कमी करणे. (मात्र कायमचे कमी करण्यापूर्वी नोंदणी अधिकारी यांची मान्यता घ्यावी लागेल.)

9) योजनेकरिता समितीने वसूल करावयाच्या ठरविलेल्या रक्कमा कायम करणे तसेच शिक्षा म्हणून ठरविलेल्या दंडाच्या रक्कमा कायम करणे.

10) संस्थेच्या कामासंबंधी करार करणे अगर त्यात जरूरीनुसार बदल करणे.

11) योग्य रितीने सभेपुढे आलेल्या कामांचा निकाल करणे.

12) ***चालू आर्थिक वर्षाच्या हिशोब तपासणीसाठी वैधानिक लेखापरीक्षकाची नियुक्ती करणे अशी नियुक्ती ही शासनमान्य तालिकेतील संस्थेस लागू असलेल्या लेखपरीक्षकांच्या प्रवर्गातून करता येईल. तसेच अशा नियुक्त केलेल्या त्याच लेखापरीक्षकाची नियुक्ती सलग कमाल तीन वेळाच करता येईल.***

***13) मागील वर्षाच्या लेखापरीक्षण अहवालाची दोषदुरुस्ती अहवालाची नोंद घेणे.***

***14) निबंधकास सादर केलेल्या/ करावयाच्या वार्षिक विवरण पत्रकांची नोंद घेणे.***

***15) संस्थेच्या होणा-या/घ्यावयाच्या पंचवार्षिक निवडणुक तारखेची नोंद घेणे.***

***16) सभासदांच्या अंतर्गत तक्रारी अथवा वाद निवारण करणेसाठी सभा तिच्या 3 जेष्ठ व अनुभवी क्रियाशील सभासदांची तक्रार निवारण समिती नियुक्त करील. मात्र अशा समितीचे सदस्य म्हणुन विद्यमान संचालक मंडळापैकी कोणाचीही नियुक्ती करता येणार नाही.***

**34.** अधिनियम कलम 76 मधील तरतूदीनुसार संस्थेला समिती सदस्यांच्या बहुमताने विशेष सर्वसाधारण सभा बोलविता येईल व त्याच तरतूदीनुसार ती बोलावली जाईल. खालील परिस्थितीत ती एक महिन्यात बोलावलीच पाहिजे.

1) संस्थेच्या एकूण सदस्यांच्या 1/5 सदस्यांनी लेखी मागणी केल्यास.

2) संस्थेचे निबंधक यांनी तशी सूचना केल्यास.

3) पाणीपुरवठा संस्थांच्या संघाने (तसा संघ असल्यास व ही संस्था त्याचा सदस्य झाल्यास तशी सूचना केल्यास)

**35.** सर्वसाधारण सभांची कार्यरिती ही नियम क्रमांक 60 मधील तरतूदीनुसार राहील.

**36.** वार्षिक सर्वसाधारण सभेची पूर्ण 14 दिवसांची व विशेष सर्वसाधारण सभेची पूर्ण 7 दिवसांची, लेखी नोटीस व कार्यक्रमपत्रिका अशा सभेपूर्वी काढून संस्थेच्या व्यवस्थापकाने ती सभा बोलावली पाहिजे. अशा सभेची सूचना नोंदणी अधिकारी यांना दिली पाहिजे. सभेची नोटीस व कार्यक्रमपत्रिका संस्थेच्या कचेरीच्या नोटीस बोर्डावर व संस्थेच्या कार्यक्षेत्रात असलेल्या गावातील प्रमुख ठिकाणी चिकटवून प्रसिध्द केली पाहिजे. नोटीसीत सभेची तारीख, नक्की वेळ, सभेचे ठिकाण व तीत केली जाणारी कामेही नमूद केली पाहिजेत. संस्थेचा सभापती व त्यांच्या गैरहजेरीत समितीचा एक सदस्य व व्यवस्थापक यांनी नोटीशीवर सहया केल्या पाहिजेत.

**37.** सर्वसाधारण सभेत हजर असलेल्या सदस्यापैकी 2/3 सदस्यांच्या परवानगीने कार्यक्रमपत्रिकेत दाखल केली नसलेली कामे कोणाही सदस्यास सभेपुढे मांडता येतील.

**38.** कोणत्याही सर्वसाधारण सभेत एकूण सदस्यांच्या संख्येच्या 1/5 अगर 25 (यापैकी कमी संख्या असेल तितके) सदस्य हजर असले म्हणजे गणपूर्ती (कोरम) झाली असे समजले जाईल. सभेत गणपूर्ती झाली नसेल तर ती सभा 7 दिवसांपर्यंत पुढे ढकलली जाईल अगर त्या सभेच्या नोटीशीत जाहीर केलेल्या त्यानंतरच्या वेळी ती सभा भरविली जाईल व तीत मूळ सभेच्या कार्यक्रम पत्रिकेतील सर्व कामे केली जातील. मग अशा सभेस गणपूर्ती असो वा नसो. सभेत काही कामे

झाल्यावर कार्यक्रमपत्रिकेतील सर्व कामे त्या दिवशी करणे शक्य नसेल तर त्या सभेस हजर असणाऱ्या सदस्यांना नियम क्रमांक 60 मधील तरतूदीनुसार त्यांनी ठरविलेल्या पण त्या भरलेल्या सभेच्या तारखेपासून 30 दिवसांपेक्षा जास्त नाही. अशा तारखेपर्यंत ती सभा पुढे ढकलता येईल. अशा पुढे ढकललेल्या सभेत कार्यक्रमपत्रिकेतील राहिलेले विषय विचाराकरिता घेतले जातील.

**39.** उपविधी क्रमांक 33 व 34 मध्ये काहीही तरतूद केली असली तरी संस्थेच्या सभासदाला काढून टाकणे अगर तिच्या संचालक मंडळाच्या सभासदाला संचालक मंडळामधून दूर करणे अगर तिच्या उपविधीत बदल करणे या संबंधीच्या नियम 60 प्रमाणे ठरावाची नोटीस, अधिनियम, नियम व संस्थेचे उपविधी यातील तरतूदीनुसार दिल्याशिवाय असा ठराव कोणत्याही सर्वसाधारण सभेपुढे आणता येणार नाही.

40. संस्थेचे अध्यक्ष हे सर्वसाधारण सभेचे अध्यक्ष राहतील. त्यांच्या गैरहजेरीत उपाध्यक्ष हे अध्यक्ष राहतील अगर यापैकी कोणीही हजर नसल्यास समिती सदस्यापैकी एका सदस्याची अध्यक्ष म्हणून निवड केली जाईल.

41. अधिनियम कलम 27 व नियम 60 मधील तरतूदीनुसार सर्वसाधारण सभेत मतदान केले जाईल. सभेस हजर असणाऱ्या सदस्यास निवडावयाच्या जागाच्या संख्येइतकी पण प्रत्येक जागेस एक याप्रमाणे मतदान करता येईल. ज्याच्यावर संस्थेच्या येणे बाकीबद्दल झालेला निवडा बजावणीस पाठविला असेल अशा सभासदांस समितीच्या निवडणुकीत मतदान करता येणार नाही. तसेच अक्रियाशील सभासदांना मतदान करता येणार नाही. समान मतप्रसंगी अध्यक्षास एक निर्णायक मत असेल सभासद विभागले गेले असतील तेंव्हा मतदान करणाऱ्या कोणाही पात्र सदस्यास मतमोजणी (पोल) करण्याची मागणी करता येईल. त्यानंतर अध्यक्ष ती मान्य करतील. प्रत्येक ठरावाचा निकाल हात वर उभारून केलेल्या मतदानावरून केला जाईल. मतदान करणाऱ्या सभासदाच्या बहुमताने प्रत्येक ठराव मंजूर केला जाईल.

42. कोणत्याही सर्वसाधारण सभेत पास झालेल्या ठरावात बदल करण्यासबंधीचा ठराव त्या सभेच्या मूळ ठरावाच्या तारखेपासून सहा महिन्यांच्या आत कोणत्याही सर्व साधारण सभेत आणता येणार नाही.

43. संस्थेस खाली दिलेल्या संस्थांना संलग्न होता येईल.

1) जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक.

2) तालुका सहकारी खरेदी विक्री संघ, तसा संघ नसल्यास जिल्हा खरेदी विक्री संघ.

3) महाराष्ट्र राज्य सहकारी भू-विकास बँक

4) सहकारी पाणीपुरवठा संघ (तसा असल्यास)

संस्था ज्या संस्थांची अगर संघाची सदस्य झाली असेल अशा संस्थांच्या अगर संघाच्या सर्वसाधारण सभांना संस्थेतर्फे तिच्या प्रतिनिधींनी हजर राहण्याबद्दल व तीत मत देण्याबद्दल अधिनियम कलम 27 च्या तरतूदींना अधिन राहून संस्था वेळोवेळी ठरवील.

44. ***सर्वसाधारण सभेचे कामकाज सभावृत्तांत नोंदवहीत पंधरा दिवसांत नोंद करण्यात आले पाहिजे आणि त्यावर व्यवस्थापक व अध्यक्ष यांच्या सह्या झाल्या पाहिजे.***

**प्रकरण सहा - संचालक मंडळ**

45. ***संस्थेच्या संचालक मंडळाने संस्थेच्या कामकाजाची व्यवस्था पाहिली पाहिजे. संचालक मंडळात तेरा संचालक असतील. संचालक मंडळाचा कालावधी निवडणूक दिनांकापासून पुढे पाच वर्षे इतका राहील. तसेच संस्थेच्या पदाधिका-यांचा कालावधी संस्थेच्या संचालक मंडळाच्या कालावधी इतका राहील.***

**संचालक मंडळाची रचना पुढील प्रमाणे राहील**

| | |
|---|---|
| *(1) सर्वसाधारण* | *- 8* |
| *(2) अनुसूचित जाती / अनुसूचित जमाती* | *- 1* |
| *(3) विमुक्त व भटक्या जमाती किंवा विशेष मागास प्रवर्ग* | *- 1* |
| *(4) इतर मागासवर्गीय* | *- 1* |
| *(5) महिला* | *- 2* |
| *एकूण* | *- 13* |

***वरील संचालक पदे संस्थेच्या सभासदामधून निवडणूकीव्दारे भरली जातील. संस्थेच्या संचालक मंडळाची निवडणूक ही राज्य सहकार निवडणूक प्राधिकरणामार्फत घेण्यात येईल.***

***46. याशिवाय संस्थेचे व्यवस्थापक हे कार्यरत संचालक (Functional Director) म्हणून संचालक मंडळावर कार्यरत राहतील. या व्यतीरिक्त संचालक मंडळ एका तज्ञ संचालकाची (Expert Director) संचालक मंडळावर स्विकृती करेल. हे दोन्ही संचालक उपविधी क्र.42 मध्ये नमूद केलेल्या संचालक संख्येपेक्षा अतिरिक्त असतील. या दोन्ही संचालकांना संचालक मंडळ सभेमध्ये मतदानाचा अधिकार असणार नाही अथवा त्यांना पदाधिकारी होता येणार नाही.***

***47. संचालक मंडळात रिक्त होणा-या जागा स्विकृतीने भरता येतील. मात्र अशा रिक्त जागा महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा 1960 व त्याखालील नियम 1961 मधील तरतुदीस अनुसरू न भरता येतील.***

48. योग्य कारण दाखविल्यावाचून ***संचालक मंडळाच्या लागोपाठ तीन सभांना गैरहजर राहिल्यास असा संचालक, संचालकमंडळातून*** कमी करण्यात येईल. तथापि कमी करण्यापूर्वी त्याला आपले म्हणणे मांडण्याची संधी दिली जाईल.

49. ***संचालक मंडळाची गणपूर्ती होण्यास त्यावेळी असणा-या संचालक मंडळाच्या एकूण सदस्य संख्येच्या 50% पेक्षा अधिक एक सदस्य संख्या आवश्यक राहील. अशा प्रकारे गणपूर्ती झाल्यानंतर सभेचे कामकाज करता येईल. मात्र कोणतेही परिस्थितीत गणपूर्तीसाठी संचालकाची कमीत कमी संख्या पाच असल्यासच गणपूर्ती होईल.***

***50. संस्थेच्या कोणत्याही पदाधिका-याविरुध्द अविश्वास ठराव हा अधिनियमातील कलम 73(1)डी व नियमातील तरतुदीनुसार आणता येईल. अशा पदाधिका-यांस विहीत पध्दती अनुसरुन पदावरुन दूर केल्यास ते पद रिक्त होईल व त्याच्या जागी पदाधिका-याची निवड करण्यात येईल.***

51. संस्थेची नोंदणी झाल्यावर संस्थेच्या कामकाजासाठी सदस्यांची एक हंगामी समिती

सभासदाकडून नेमली जाईल व ही हंगामी समिती नियम क्रमांक 59 मधील तरतूदीनुसार नवीन समिती निवडून येईतोपर्यंत एक वर्षापेक्षा जास्त नाही इतक्या मुदतीपर्यंत काम करील.

उपविधीनुसार निवडून आलेल्या संचालक मंडळाप्रमाणे सदर हंगामी समितीस उपविधी क्रमांक 65 मध्ये नमूद केलेली सर्व कामे करण्याचे अधिकार असतील, हंगामी समितीवरील सदस्यापैकी एखादी जागा रिकामी झाल्यास अशी जागा हंगामी समितीच्या उर्वरित संचालक सभासदांनी भरल्या जातील.

52. ***समितीच्या सभासदांची निवडणूक राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणामार्फत घेतली जाईल.***

53. इतर उपविधीत काहीही नमूद केले असले तरी जर काही अपरिहार्य परिस्थितीमध्ये कोणतीही नवीन संचालक मंडळ बनू न शकल्यास आणि पूर्वीची समिती मुदत संपली असल्यास संस्थेचे दैनंदिन काम पाहण्यासाठी नवीन समिती अधिकारावर येईपर्यंत तीनपेक्षा सदस्य अधिक नसलेल्या समितीची किंवा एक किंवा एकापेक्षा अधिक अधिकृत अधिका-यांची नियुक्ती करण्याचे अधिकार निबंधक यांना अधिनियम कलम 77अ प्रमाणे असतील. अशा नियुक्त समितीस किंवा अधिकृत अधिका-यास निवडून आलेल्या संचालक मंडळाप्रमाणेच उपविधीतील सर्व अधिकार राहतील.

54. नियम 58 मधील तरतूदीनुसार संचालक मंडळाचा एखादा सदस्य संचालक मंडळावर राहण्यास अपात्र ठरला असल्यास अगर त्यास फौजदारी गुन्हयाबद्दल एक वर्ष व एक वर्षापेक्षा अधिक तुरूंगवासाची शिक्षा झाली असल्यास त्यास समितीवर सदस्य म्हणून राहता येणार नाही.

55. ***समिती सदस्यांच्या व्यक्तीश: हितसंबंध असणाऱ्या बाबींचा विचार चालू असता त्याला समिती सभेस हजर राहता येईल तथापि त्यास मतदानाचा हक्क असणार नाही.***

***56. संचालक मंडळ सभेची नोटीस ही कमीत कमी पूर्ण पाच दिवसांची असली पाहिजे व व्यवस्थापकाने सदरची नोटीस सर्व संचाकांना पाठविली पाहिजे. अशा सभा अध्यक्षाच्या सूचनांनुसार व्यवस्थापकाने बोलविल्या पाहिजेत. इतर संचालकांनी मागणी करुनही संचालक मंडळाची सभा बोलविण्याच्या कामी अध्यक्षांकडून टाळाटाळ होत असेल तर सभा बोलाविण्यासाठी संचालकांनी बहुमताने दिलेली लेखी मागणी व्यवस्थापकावर बंधनकारक राहील.***

57. अधिनियम, नियम व संस्थेचे उपविधी यातील तरतूदी व सर्वसाधारण सभांनी वेळोवेळी केलेले ठराव यानुसार संस्थेचे काम चालविण्याचा तसेच त्यासाठी दुय्यम विनियम करण्याचा समितीस पूर्ण अधिकार राहील. मात्र ते विनियम सर्वसाधारण सभा व नोंदणी अधिकारी यांनी पसंत केल्यावरच अंमलात येतील.

***58. पंचवार्षिक निवडणुकीनंतर होणा-या संचालक मंडळाच्या पहिल्या सभेत संचालक मंडळाने आपल्यापैकी एक सभासद अध्यक्ष व एक सभासद उपाध्यक्ष म्हणून निवडले पाहिजे. त्या अध्यक्षाने सर्व सभांचा अध्यक्ष म्हणून काम केले पाहिजे. अध्यक्ष गैरहजर असेल तेंव्हा उपाध्यक्ष व दोघेही गैरहजर असतील तेव्हा सभेस हजर असलेल्या सभासदांनी आपल्यापैकी एका सभासदास त्या सभेकरिता अध्यक्ष म्हणून निवडला पाहिजे. अध्यक्ष सभासद या नात्याने असलेल्या मताखेरीज समान मतप्रसंगी एक जादा निर्णायक मत देण्याचा अधिकार असेल. अध्यक्ष/उपाध्यक्ष यांचा कालावधी संचालक मंडळाएवढा राहील. मात्र या मुदतीत समितीने त्यांच्यावर अविश्वास प्रकट केला नसला पाहिजे. अविश्वास प्रकट केल्यानंतर तो अध्यक्ष कमी होईल व संचालक मंडळ सभासद आपल्यामधून दुसरा अध्यक्ष निवडतील, मात्र संचालक मंडळाच्या सभेत पदाधिका-यांच्या निवडणुक प्रसंगी समान मते झाल्यास ईश्वर चिठ्ठीव्दारे त्यावर निर्णय घेण्यात येईल व अशा प्रसंगी अध्यक्षास त्याच्या मताखेरीज ज्यादाचे म्हणजेच निर्णायक मत देता येणार नाही.***

59. समितीच्या एकूण सदस्यांच्या 1/3 सदस्यांच्या लेखी मागणीनुसार संस्थेच्या पदाधिकाऱ्यांविरूध्द त्याच्या गैर कृत्याबद्दल अविश्वाचा ठराव आणता येईल. सदर मागणी निबंधकाकडे दाखल होताच कायदा कलम 73 H व त्याखालील नियमांनुसार निबंधक कार्यवाही करतील.

60. अविश्वास ठराव कायदा व नियमातील तरतुदीनुसार मंजूर झाल्यास संबंधित पदाधिकारी कमी झाला असे समजले जाईल.

61. अध्यक्षास सात दिवसांची लेखी सुचना समितीकडे पाठवून आपल्या जागेचा राजीनामा देता येईल. सदरची सुचना या मुदतीत समितीपुढे ठेवण्याकरिता तिची सभा बोलावण्याची व्यवस्था व्यवस्थापकाने केली पाहिजे.

62. संस्थेच्या कामाकरिता संचालक मंडळाच्या आवश्यक तितक्या सभा भरविल्या जातील. परंतु दरमहा निदान एकतरी सभा भरली पाहिजे. सभांचा वृत्तांत नोंदवहीत व्यवस्थापकाने सभा झाल्यानंतर पंधरा दिवसांच्या आत ठेवला पाहिजे.

63. **समितीची कामे पुढील प्रमाणे असतील -**

1) सदस्य होण्यासाठी व भागासाठी आलेला अर्जावर निर्णय घेणे.

2) पाणीपुरवठा योजनेसाठी कर्ज काढणे, ठेवी स्वीकारणे व त्याच्या अटी ठरविणे.

3) भागांच्या व येणाऱ्या इतर रक्कमांचा वसूल घेणे व आलेल्या रकमा कशारीतीने जमा करावयाचा ते ठरविणे.

4) बंधारे बांधणे, पाण्याचा साठा करणे, पाण्याचे प्रवाह, कालवे अगर पाट खोदणे, इंजिने

विजेच्या मोटारी व यंत्रसामग्री बसवून पाणी उपसणे व ते पुरविणे व पाणीपुरवठा योजनेकरिता तदनुषंगिक कामे हाती घेणे व त्याकरिता जरूर ते भांडवल उभारणे.

5) पाणीपुरवठा योजनेकरिता इंजिने, विजेच्या मोटारी, यंत्रसामग्री, पंप, हत्यारे इत्यादी लागणारी साधने विकत अगर भाडयाने घेणे व ती स्वत: पाणीपुरवठा योजनेकरिता वापरणे अगर सोईस्कर रीतीने ती भाडयाने देणे.

6) विवक्षित क्षेत्रापुरत्या अगर कामाकरिता उपसमित्या नेमणे.

7) संस्थेच्या व्यवहारासंबंधी सोईस्कर करार करणे.

8) येणे बाकी वसूल करण्याची तजवीज करणे.

9) तहकूबी मिळण्याकरिता आलेल्या अर्जाचा विचार करणे.

10) अ) ***संस्थेच्या किर्दीवरुन दिसून येणारी रोख शिल्लक रक्कम निदान पंधरा दिवसातून एकदा तपासून पाहण्याचा व इतर मालमत्ता निदान महिन्यातून एकदा तपासून पाहण्याचा आणि अशा तपासणीचा अहवाल लगेच भरणाऱ्या व्यवस्थापक समितीच्या सभेत सादर करण्याचा अधिकार समितीच्या एका संचालकास दिला जाईल. जर रोख शिल्लकेत अगर इतर मालमत्तेत काही तूट आल्याचे दिसून आल्यास व्यवस्थापक समिती अशी तूट वसूल करण्याकरिता ताबडतोब जरुर ती कारवाई करील. यात कसूर झाल्यास कसूरदार व्यक्तीवर जबाबदारी निश्चित करण्यात येईल तथापि याबाबत कारवाई न झाल्यास व्यवस्थापक समिती सामुदायिकरित्या (एकत्रित) व व्यक्तीश: अशा तुटीची भरपाई करण्यास जबाबदार राहील.***

10 ब) सहकारी संस्थांचा अधिनियम व त्याखालील नियम व संस्थेच्या उपविधीप्रमाणे व्यवस्थापक समितीकडे सोपविलेली कामे पार पाडण्यात हयगय, निष्काळजीपणा झाल्यामुळे संस्थेस जे नुकसान पोहोचेल त्याची भरपाई करण्यास व्यवस्थापक समिती व्यक्तीश: व सामुदायीकरित्या जबाबदार राहील.

11) व्यवस्थापकाकडून हिशोबाची जरूर ती पुस्तके वेळच्यावेळी लिहून घेणे, ती तपासणे व रोख शिल्लक मोजून पाहणे.

12) सदस्य आपल्या जमिनी योग्यरितीने भिजवितात का ते पाहणे व त्यांना याबाबत जरूर त्या सुचना देणे, बिगरपरवाना पाणी घेणे अगर गैरवर्तणुकीबद्दल रूपये 500/- पर्यंत दंड करणे.

13) एखादा सदस्य कालव्याची, पाटाची अगर संस्थेच्या इतर मालमत्तेची नासधूस करीत असेल अगर पाण्याच्या पाळीत अडथळा किंवा व्यत्यय आणित असेल तर त्याबाबत जरूर ती खबरदारी घेणे व दोषी ठरल्यास त्याच्याकडून पुरेशी नुकसानभरपाईची रक्कम वसूल करणे . दोषी ठरविण्यापूर्वी आपले म्हणणे मांडण्यास त्याला संधी दिली जाईल.

14) ***संचालक मंडळ दरवर्षी आर्थिक वर्ष समाप्तीनंतर सहा महिन्याचे आत (30 सप्टेंबर पूर्वी) त्या आर्थिक वर्षातील पुढील व्यवहारांची विवरण पत्रके संस्थेच्या वार्षीक सर्वसाधारण सभेपुढे सादर करेल व तद्नंतर निबंधकांकडे दाखल करेल.***

***अ) संस्थेच्या कार्याची माहिती देणारी विवरण पत्रक***

***ब) अहवाल वर्षाचा वैधानिक लेखा परिक्षण अहवाल***

***क) नफा वाटणी नियोजन***

***ड) उपविधी दुरुस्ती***

***इ) वार्षिक सभेची तारीख तसेच निवडणूक असलेस त्याची तारीख***

***ई) वार्षिक सभेने नियुक्त केलेल्या वैधानिक लेखा परिक्षकाची माहिती व त्याचे संमत्तीपत्र.***

15) व्यवस्थापक, इंजिन अगर मोटार ड्रायव्हर अगर शेतीतज्ज्ञ यांना तात्पुरते नेमणे अगर कमी करणे, त्यांना कायमपणे नेमण्याबद्दल अगर कमी करण्याबद्दल सर्वसाधारण सभेकडे शिफारस करणे, सर्वसाधारण सभेने केलेला निकाल नोंदणी अधिकारी यांच्या मंजूरीस अधिन राहील. इतर पगारी अधिकाऱ्यांना व सेवकांना नेमणे, त्यांना ताकीद देणे अगर दंड करणे किंवा तात्पुरते अगर कायमपणे कामावरून दूर करणे, सर्व अधिकाऱ्यांच्या व सेवकांच्या अनुक्रमे पगाराची व भत्त्याची श्रेणी (स्केल) व रक्कम ठरविणे अगर त्यात बदल करणे, सर्व कर्मचाऱ्यांवर देखरेख व नियंत्रण ठेवणे व या सर्वाबाबत विनियम तयार करणे व ते सर्वसाधारण सभेपुढे मंजूरीस ठेवणे. मात्र ते विनियम नोंदणी अधिकारी यांनी पसंत केल्यावरच अंमलात येतील.

16) कायदेविषयक कामे चालविणे, त्या कामासंबंधात प्रतिपक्ष चालविणे किंवा समितीला योग्य वाटल्यास एखाद्या बाबतीत तडजोड करणे, संस्थेतर्फे कायदेविषयक कामे चालविण्याकरिता तिच्या अधिकाऱ्यास किंवा अधिकाऱ्यांना अधिकार देणे.

17) सर्वसाधारण सभेच्या मंजूरीने उपविधी क्रमांक 5(अ) मधील उद्देश पार पाडण्यासाठी जरूर ती कामे हाती घेणे व त्याबाबत कार्यक्रम आखून तो पार पाडणे आणि त्याकरिता भांडवल पुरविण्याची व्यवस्था करणे.

18) मालाचे नोंद बुक तपासणे व शिल्लक माल बरोबर आहे किंवा नाही ते पाहणे.

19) संस्थेच्या मालाची गुदामे व संस्थेच्या इमारती, इंजिने इत्यादी यांचे आगिपासून नुकसान होऊ नये म्हणून योग्य बाजारदराने विमा कंपनीमध्ये विमा उतरण्याची व्यवस्था करणे.

20) वार्षिक सर्वसाधारण सभेच्या मान्यतेने योजनेचा भांडवली व चालू खर्च यांचा विचार करून प्रत्येक सदस्याने त्यांच्या भिजवावयाच्या क्षेत्राच्या प्रमाणात भांडवली व चालू खर्चाकरिता किती रक्कम भरावयाची ते ठरविणे अगर त्यात बदल करणे.

20 अ) संस्थेच्या कमांड एरियामध्ये भिजवावयाच्या क्षेत्रामध्ये असणाऱ्या विहिरीवर संस्थेचा

पाणीपुरवठा चालू होण्यापूर्वी जे क्षेत्र भिजत असेल ते वगळून पाणी पुरवठा योजनेमुळे संस्थेच्या कार्यक्षेत्रात (सर्क्युलेशनने) पाझरून येणाऱ्या पाण्यावर लागण होणाऱ्या निरनिराळया पिकांच्या क्षेत्रावर तसेच कार्यान्वित झाल्यावर नवीन काढलेल्या विहिरीवर अगर काढण्यात येणाऱ्या विहीरीवरील क्षेत्रावर अगर ओढयावरील पाझर पाण्याच्या क्षेत्रावर जे पिक क्षेत्र येत असेल त्यावर पाणीपट्टी आकारणी व वसुली याबाबत संस्थेचे पदाधिकारी व संबंधित शेतकरी यांच्या पूर्व विचाराने पाणीपट्टी आकारणी व वसुली यांचा निर्णय कायम केला जाईल. असा निर्णय होत नसेल तर या बाबतीत निबंधकाने दिलेला निकाल संस्थेवर व त्या शेतकऱ्यांवर बंधनकारक राहील.

21) सरकारी कर्जाचे हप्ते त्यावरील व्याज, यंत्रे, यंत्रसामुग्री व इतर मालमत्ता यावरील झीज व योजनेचा चालू खर्च विचारात घेऊन वार्षिक सर्वसाधारण सभेच्या मंजूरीने पाणी पुरवठयाचे दर ठरविणे अगर त्यात बदल करणे व ठरविलेल्या दराप्रमाणे पाणीपट्टी वसूल करणे.

21अ) पाण्याचे दर, पाळया, पाणी, वापराबद्दलची पध्दती वगैरे संबंधी विनियम तयार करणे, मात्र असे विनियम सर्वसाधारण सभेची मंजूरी घेतल्याशिवाय अंमलात येणार नाही.

22) ज्या व्यवस्थापक व इतर अधिकाऱ्यांचा व सेवकांचा रोकडीशी, मालाशी, महत्वाच्या कागदपत्रांशी अगर रोख्याशी सबंध येत असेल. अशांच्याकडून नियम क्रमांक 107 (ब) मध्ये ठरविलेल्या रक्कमेच्या व प्रकारच्या प्रमाणानुसार तारण घेण्याची व्यवस्था करणे.

23) लेखापरीक्षण यादी विचारात घेणे अधिनियम कलम 82 व नियम 73 मधील तरतूदीनुसार लेखापरीक्षण दोष दुरूस्तीचे प्रतिवृत्त नियतांच्या 'ओ' नमुन्यात निबंधक यांच्याकडे पाठविणे आणि लेखापरीक्षा यादी व दोष दुरूस्ती प्रतिवृत्त पुढील सर्वसाधारण सभेपुढे ठेवणे.

24) वार्षिक सर्वसाधारण सभेच्या पूर्व मंजूरीने संस्थेकरिता सोईस्कर इमारती, जागा, गुदामे विकत अगर खंडाने अगर भाडयाने घेणे व त्याबाबत करार करणे.

25) संस्थेची जागा, जमिनी, बंधारे, कालवे, पाट, पाझर वाहून नेणारे चर, यंत्रे, मोटारी, यंत्रसामग्री इत्यादी मालमत्ता सुरक्षित ठेवण्याची व्यवस्था करणे व त्यापैकी काहींची जरूरी नसल्यास वार्षिक सर्वसाधारण सभेच्या मान्यतेने त्यांची विक्री करून अगर अन्यरीतीने विल्हेवाट लावणे.

26) जमीन सुधारण्याचा कार्यक्रम आखून शेती उत्पादन वाढीस प्रोत्साहन देणे.

27) निबंधक यांच्या सर्व सामान्य मार्गदर्शन व देखरेखीखाली पाणी पुरवठा योजना चालविणे.

28) सरकारी व बँकेचे कर्ज योग्य मुदतीत परत फेडण्याची खबरदारी घेणे व त्यासाठी दरवर्षी नफ्यातून व अन्यरीतीने कर्ज परत फेड निधी वाढविणे.

29) संस्थेचे उद्देश पार पाडण्याच्या दृष्टीने सर्वसाधारणपणे संस्थेचा व्यवहार चालविणे.

***30) सभासदांच्या तक्रारीचे निवारण करण्यासाठी व अंतर्गत वादाचा निपटारा करण्यासाठी वार्षिक सभेने नियुक्त केलेल्या संचालकाव्यतीरिक्त तीन जेष्ठ व अनुभवी***

***सभासदांच्या तक्रार निवारण समितीकडे अशा तक्रारी सादर करेल व अशा समितीची सभा घेणेची तजवीज करेल. सदर समितीकडे सादर केलेल्या तक्रारीची शक्य तो तीन महिन्यांचे आत कार्यवाही व निपटारा होईल याची दक्षता घेईल.***

***31) अहवाल वर्षाची हिशेब तपासणीची ज्ञापने आणि तपासणीची टिपणे संस्थेच्या सर्वसाधारण सभेपुढे ठेवणे, गतवर्षाचा हिशेब तपासणी, दोषदुरुस्ती अहवाल तयार करणे व तो वार्षिक सभेपुढे ठेवून खात्याकडे विहीत नमुन्यात सादर करणे.***

संचालक मंडळ सभासदंानी वरील कामे पार पाडण्याच्या कामी हयगय केल्यास, हयगयीमुळे होणाऱ्या संस्थेच्या नुकसानीस ते स्वत: वैयक्तीक व सामुदायिकरितीने जबाबदार धरले जातील.

## प्रकरण आठ - व्यवस्थापक

**64.** नियम 57 मधील तरतूदीप्रमाणे संस्थेच्या एखाद्या करारात, व्यवहारात, खरेदी केलेल्या अगर विकलेल्या मिळकतीत व्यवस्थापकाला अगर पदाधिकाऱ्याला कसलाही भाग अगर हितसंबंध ठेवला येणार नाही.

अ) पाणीपुरवठा संस्थेच्या कामासाठी आवश्यक असणाऱ्या कर्मचाऱ्यांची रचना संस्थेच्या पाणी पुरवठा योजनेच्या अंमलबजावणीसाठी संस्थेकडे खालील प्रमाणे आवश्यकतेनुसार कर्मचारी राहतील.

1) व्यवस्थापक - सचिव 2) तांत्रिक कर्मचारी

3) हिशेबनीस 4) लेखनिक

5) यंत्रचालक 6) पाटकरी

7) शिपाई

संस्थेच्या कामाची व्याप्ती व त्यातील आर्थिक स्वयंपूर्तता लक्षात घेऊन कर्मचाऱ्यांची संख्या राहील. तांत्रिक कर्मचारी (अभियंता तांत्रिक सहाय्यक) व व्यवस्थापक यांच्या नियुक्तीसाठी संस्थेची निवड समिती राहील. निवड समिती खालील सदस्यांची राहील.

1) संस्थेचे अध्यक्ष हे निवड समितीचे पदाधिकारी अध्यक्ष राहतील.

2) संस्थेच्या व्यवस्थापक समिती सदस्यापैकी एक सदस्य.

**65.** व्यवस्थापक, इतर अधिकारी, कर्मचारी व सेवक हे समितीच्या नियंत्रणाखाली राहतील व्यवस्थापकांची कामे पुढील प्रमाणे असतील.

1) संस्थेच्या सर्वसाधारण सभा तसेच समितीच्या सभा बोलावणे व त्यांना हजर राहणे.

2) अशा सभांत होणाऱ्या कामांची नोंद वृत्तांत पुस्तकांत करणे.

3) समितीच्या हुकूमाने पैसे खर्च करणे व येतील त्या रक्कमा घेणे व जमा करणे.

4) नियम 65 मध्ये नमूद केलेली व संस्थेची सर्व पुस्तके, नोंदवहया (रजिस्टर्स) व हिशेब वेळच्यावेळी लिहून ठेवणे.

5) जमा पावत्या, खर्चाच्या पावत्या (व्हौचर्स) व संस्थेचे काम चालविण्याकरिता लागणारे इतर सर्व कागदपत्रे लिहून तयार ठेवणे.

6) नियम 61 व 62 प्रमाणे वार्षिक हिशोबाची पत्रके ठरलेल्या मुदतीच्या आत तयार करून संचालक मंडळापुढे ठेवणे व ती वैधानिक लेखापरीक्षकाकडे मुदतीत पाठविण्याची व्यवस्था करणे.

7) संस्थेचा पत्रव्यवहार चालविणे व सभासदांना लागणारी जरूर ती माहिती पुरविणे.

8) लेखापरीक्षण अहवाल आल्यानंतर ताबडतोब ती संचालक मंडळाच्या विचाराकरिता तिच्यापुढे ठेवणे व तिच्यात दाखविलेले दोष व चुका दुरूस्त करण्याबाबत जरूर ती तजवीज करणे व नियम क्रमांक 73 प्रमाणे दोष दुरूस्ती प्रतिवृत्त ठरलेल्या मुदतीच्या आत समितीपुढे ठेवून ते पुढे पाठविण्याची व्यवस्था करणे.

9) संस्थेच्या पगारी अधिकाऱ्यांना, कर्मचाऱ्यांना व सेवकांना कामाच्या दिशा दाखविणे, त्यांना मार्गदर्शन करणे, त्यांच्यावर देखरेख ठेवणे व त्यांचे नियंत्रण करणे.

10) संस्थेतर्फे दिल्या जाणाऱ्या जमेच्या पावत्यांवर व्यवस्थापकाने सहया केल्या पाहिजेत. भागांचे भागपत्रे, दस्तऐवज व इतर महत्वाची कागदपत्रे यावर व्यवस्थापक व समितीचा एक सदस्य यांनी सहया करून दिल्या पाहिजेत.

11) संस्थेचा माल व इतर जिंदगी यांची सुरक्षितता राखणे.

22) संस्थेची इंजिने, विजेच्या मोटारी, यंत्रसामग्री, बंधारे, कालवे, पाट पाझर वाहून नेणारे चर इत्यादी जिंदगी सुस्थितीत ठेवणे, त्यांना लागणाऱ्या दुरूस्त्या करून घेणे व त्याच्यावर लक्ष ठेवणे.

13) संस्थेच्या समितीने सोपविलेली इतर कामे करणे.

**66.** उपविधी क्रमांक 63 मध्ये निर्दिष्ट केलेली समितीची कामे समितीचा मुख्य कार्यकारी अधिकारी या नात्याने पार पाडण्याची जबाबदारी व्यवस्थापकावरही राहील.

**67.** व्यवस्थापकाच्या गैरहजेरीत त्याची तात्पुरती कामे करण्यास समितीला दुसऱ्या एखाद्या इसमास अधिकार देता येईल.

**68.** व्यवस्थापकाने वरील कामे पार पाडण्याच्या कामी हयगय केल्यास त्या हयगयीमुळे होणाऱ्या संस्थेच्या नुकसानीबद्दल त्याला वैयक्तीकरितीने जबाबदार धरले जाईल.

69. संस्था आपल्या कर्मचाऱ्यांसाठी संबंधित कायदयातील तरतुदीनुसार भविष्य निर्वाह निधी (प्रॉव्हीडंट फंड) स्थापन करील व नको असलेले निधी सुस्थितीत ठेवण्यासंबंधीचे व त्याचा उपयोग करण्यासंबंधीचे विनिमय निबंधक यांच्या पूर्व संमत्तीने संस्था तयार करील. या निधीची स्थापना व व्यवस्था अधिनियम कलम 71 व नियम 56 मधील तरतूदीप्रमाणे केली जाईल.

## प्रकरण नऊ - पाणी पुरवठा योजनेची कार्यपध्दती

70. योजनेच्या कामाची व्याप्ती व खर्च याचा विचार करून योजनेच्या कक्षेतील आपल्या जमिनीकरिता पाणी घेणाऱ्या प्रत्येक सदस्याने संस्थेच्या भागाच्या भांडवलाकरीता किती व कसकशी रक्कम भरावयाची, योजनेखाली काढलेले कर्ज व त्यावरील व्याज यांचे हप्ते परत फेडण्याकरिता अशा प्रत्येक सदस्याने किती व कसकशी रक्कम भरावयाची यांचा तपशील दाखविणारे पत्रक संस्थेने तयार करून व तज्ज्ञांकडून ते तपासून घेऊन आणि सर्वसाधारण सभेत ते मंजूर करून निबंधक यांच्याकडे संस्था नोंदवल्याच्या तारखेपासून 3 महिन्यांचा आत अगर त्यांना वाढविलेल्या मुदतीत उपविधीपैकीच एक भाग म्हणून नोंदण्यासाठी पाठविले पाहिजे. योजनेचे भांडवली व चालू खर्च दाखविणारे आकडे व नकाशे तयार करून ते ही या पत्रकासोबत पाठविले पाहिजेत. योजनेच्या जमेच्या उत्पन्नाचे व खर्चाचे अंदाजपत्रक तयार करून योजना कशी यशस्वी होईल याचा तपशील जोडला पाहिजे. या पत्रकाची नोंद केल्यावरच त्यातील तपशीलाप्रमाणे संस्थेने काम केले पाहिजे व त्याप्रमाणे रक्कमा वसूल व खर्च केल्या पाहिजेत.

71. योजना कार्यान्वित करण्यासाठी मंजूर झालेल्या कर्जाची रक्कम, त्यासाठी घालण्यात आलेल्या सर्व अटींची पूर्तता करून संस्था नोंदविल्यापासून तीन महिन्याच्या आत अगर निबंधकाने वाढवून दिलेल्या मुदतीत उचलली गेली पाहिजे. कोणत्याही कारणास्तव मंजूर झालेले कर्ज उचलले न गेल्यास व त्यासाठी कर्जपुरवठा करणाऱ्या संस्थेस मंजूर झालेल्या कर्जाबाबत नोटीस खर्च (कमिटमेंट चार्जेस) भरावा लागल्यास तो खर्च सभासदाकडून योजनेखाली भिजू शकणाऱ्या त्यांच्या क्षेत्राच्या प्रमाणात किंवा निबंधक ठरवतील त्या प्रमाणात केला जाईल. पाणीपट्टी व दराच्या आकारणीमध्ये खालील महत्वाच्या बाबी समाविष्ट करून संस्था सभासदाच्या क्षेत्रावर दर एकरी आकारणी करील. संस्थेने निश्चित केलेल्या दर एकरी पाणीपट्टीच्या आकारणी दरात खालील बाबींचा समावेश असेल.

(1) कर्जाची हप्ता व त्यावरील व्याज.

(2) योजनेची देखभाल व यंत्रसामुग्री दुरूस्ती यावरील खर्चाची तरतूद.

(3) योजनेच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक लागणाऱ्या कमीत कमी तांत्रिक व व्यवस्थापकीय कर्मचाऱ्यांच्या वरील खर्चाची तरतूद.

(4) पाणी उचल करण्यासाठी व पाणीवाटपासाठी जादा कर्मचाऱ्यांची आवश्यकता असेल तर

त्यावरील खर्चाची तरतूद.

(5) इंधनाचा खर्च.

वरील बाबींवर आधारित पाणीपट्टी आकारणीचे दर संस्थेच्या वार्षिक साधारण सभेत ठरविले जातील.

72. उपविधीमध्ये नमूद केलेले उत्पन्न हे त्याने दाखविलेल्या खर्चाकरिता अगर योजनेचे काम पुरे करण्याकरिता अगर त्या कामाची दुरूस्ती करण्याकरिता अपुरे पडल्यास कमी पडणारी पुरेशी रक्कम कसकशी व कोणाकडून वसूल करावयाची हे दाखविणारी पुरवणी पत्रके तयार करून व उपविधी मध्ये सांगितलेल्या रीतीने मंजूरीकरता संस्थेने पाठविले पाहिजे व त्याप्रमाणे रक्कमा वसूल केल्या पाहिजेत.

73.1) उपविधीमध्ये नमूद केलेल्या जसजसा प्रत्यक्ष खर्च होईल तसतसा त्या दर तिमाही अखेर त्यांच्या सदस्यांच्या भिजवावयाच्या क्षेत्राच्या प्रमाणात ज्या त्या सदस्याला कर्ज दिले असे समजून कर्ज खात्यात व संस्थेच्या इतर संबंधीत पुस्तकात नावे मांडल्या जातील . उपविधीमध्ये निर्दिष्ट केलेली रक्कम ज्या त्या सदस्याचे कर्ज खात्यात व इतर संबंधीत पुस्तकात नावे मांडली जाईल. अशारीतीने नावे मांडलेल्या रक्कमांची पोहोच ज्या त्या सदस्याने लिहून दिली पाहिजे. सदस्याने वसूल दिल्यावर तो त्याच्या कर्ज खात्यात जमा केला जाईल.

2) सदर कर्जास तारण म्हणून प्रत्येक सदस्याने आपल्या स्वत:च्या अगर खंडाच्या जमिनीचे कर्जाच्या निदान दुप्पट किंमतीचे गहाण खत अगोदर लिहून दिले पाहिजे. जमिनीचे तारण संस्थेच्या योजनेकरिता सरकार, जिल्हा मध्यवर्ती सहकारी अगर भू विकास बँक यांच्याकडे अगर अन्य रितीने संस्थेने काढलेल्या कर्जाच्या अगर ठेवीच्या परतफेडीस तारण म्हणून सदर गहाणखतावर जरूर तो शेरा मारून ती गहाणखते वर्ग करून दिली जातील.

3) या कर्जावरील व्याजाचा दर सर्वसाधारण सभा वेळोवेळी ठरवील व होणारे व्याज ज्या त्या सभासदाच्या कर्ज खात्यास वर्षअखेर नावे मांडले जाईल. आपला विक्रीलायक शेतीचा माल सहकारी संस्थेमार्फत विकून त्यातून कर्जफेड केल्यास व्याजात 1 टक्का सूट देण्यात येईल. व्याजाचा दर विशेष परिस्थितीत कर्ज अगर ठेवी देणाऱ्याच्या नावे वार्षिक सर्वसाधारण सभेच्या ठरावाव्दारे 9 टक्क्यापर्यंत वाढविता येईल. अनाधिकाराने थकविलेल्या रक्कमेवर व्याजाच्या दरापेक्षा द.सा.द.शे. 2 टक्के प्रमाणे जादा व्याज आकारले जाईल.

4) योजनेचे प्रत्यक्ष पाणी देण्यास सुरूवात झाल्यानंतर कर्ज स्वीकारताना मान्य केलेल्या अटींना अनुसरून कर्जफेडीचे हप्ते वसूल केले जातील. कर्जाचा हप्ता ठरलेल्या मुदतीत न फेडल्यास कर्जाची सर्व रक्कम वसुली तारखेपर्यंतच्या व्याजासह ताबडतोब परत मागण्याचा अधिकार नियम 64 ला अनुसरून संचालक मंडळास राहील. तसेच जर एखाद्या सभासदाने संस्थेच्या उपविधीचे उल्लंघन अगर आदेशाची अवहेलना केल्यास अगर योजना पुरी करण्यास अगर ती

चालविण्यास असहकार केल्यास अगर अडथळे आणल्यास प्रत्यक्ष पाणी देण्यास सुरूवात करण्यापूर्वीही अगर नंतर त्याच्याकडील सर्व येणे कर्ज, त्यावरील व्याजासह परत मागण्याचा समितीला अधिकार राहील.

5) कर्जास जामीन राहिलेला एखादा सदस्य मयत झालेस किंवा संचालक मंडळाच्या मते लायक ठरत नसेल तर दुसरा सभासद जामीन आणून देण्यास त्या कर्जदारास लेखी कळविण्यात येईल. जर तसा दुसरा जामिनदार आणला नाही तर त्याचे सर्व कर्ज वसुलीच्या तारखेपर्यंतच्या व्याजासह ताबडतोब परतफेड केली जाण्यास पात्र ठरेल.

6) कर्जदाराच्या स्वत:च्या कोणत्याही चुकीवर अवलंबून नसलेल्या अशा योग्य कारणामुळे कर्जदाराला कर्जफेड करता येणे मुळीच शक्य झाले नाही, अशी समितीची खात्री झाल्यास व त्याने तहकूबी मिळण्याकरिता अर्ज केल्यास त्या कर्जाची मुदत वाढविण्याचा समितीला अधिकार आहे. योजनेसाठी कर्ज पुरविणाऱ्या संस्थेच्या पूर्व परवानगीशिवाय, तसेच कर्जास जामिनदार असल्यास त्याच्या लेखी संमतीशिवाय कोणतीही तहकूबी मुदत दिली जाणार नाही.

7) कर्जफेडीची मुदत संपल्यावर कर्जाचा वसूल न आल्यास अगर तहकूबी दिली नसल्यास मूळ कर्जदारास व त्यांचे जामीनदार (जामीनदार घेतलेले असल्यास) यांना कर्ज वसुलीची नोटीस देण्यात येईल. नोटीशीत नमूद केलेल्या मुदतीत रक्कम भरलीच पाहिजे असा आदेश नोटीशीत दिला जाईल. सदर मुदतीत समाधानकारक वसूल न झाल्यास त्या कर्जदारावर योग्य त्या प्राधिकरणाकडे वसुली दावा दाखल केला जाईल. सदर प्राधिकरणाने कर्जदाराविरूध्द दिलेल्या निवाडयावर (हुकूमनाम्यावर) अपिल केले नसल्यास अगर पैसे भरण्यासाठी निवाडयात (हुकूमनात्यात) मुदत दिली नसल्यास, निवाडा (हुकूमनामा) ताबडतोब बजावणीस पाठविला पाहिजे. तो पाठविण्याची जबाबदारी समितीवर राहील. अपिलात मिळालेल्या निवाडयाच्या बजावणीबाबतही याप्रमाणेच कारवाई केली जाईल.

8) सभासदाने संस्थेकडून पाण्याचा फायदा घेतला नसला तरी सरकारी कर्जाचा अगर बँकेला कर्जाचा हप्ता व त्यावरील संस्थेने देणे व्याज उपसा सिंचन योजनेतील मशीनरीची देखभाल व झीज आणि इतर खर्चासाठी विहित दराने पाणीपट्टी जो देणार नाही त्यांच्या विरूध्द त्याच्याकडे येणे असलेली पाणीपट्टी बाकी त्यावरील व्याज व दंडाच्या रकमा वगैरे ,कायदा कलम 101 नुसार कारवाई करून ती वसूल केली जाईल.

**75.** कर्जफेडीसाठी ठरविलेल्या तारखेदिवशी कर्जाच्या रक्कमेचीफेड न केल्यास ती तारीख ही सहकारी संस्था नियम 58 (1) (अ) च्या कारणाकरिता त्या कर्जाच्या थकबाकीची तारीख समजली जाईल.

**74.** प्रत्येक सदस्याने समितीच्या सुचना अंमलात आणल्याच पाहिजेत. नाही तर तो 50/- रूपये पर्यंत दंडास पात्र राहील. प्रत्यक्ष दंड करण्यापूर्वी आपले म्हणणे मांडावयास त्याला 15

दिवसांची लेखी नोटीस दिली पाहिजे.

## प्रकरण दहा - संकीर्ण

**78. ठेवी** - संस्थेशी ठेवीचे व्यवहार पुढील अटींवर केले जातील.

(1) सहा महिन्याहून कमी नसणाऱ्या मुदतीच्या ठेवी स्वीकारल्या जातील.

(2) पासबुक हजर केल्याशिवाय कोणतीही ठेव स्वीकारली जाणार नाही अगर कोणतीही ठेव परत केली जाणार नाही. पासबुकात नमूद न केलेल्या कोणत्याही रक्कमेबद्दल संस्था जबाबदार नाही.

(3) ठेवीचे खाते सुरू करताना ठेवीदारास पासबुक देण्यात येईल, अगर ते संपूर्ण भरल्यावर दुसरे पासबुक देण्यात येईल. पासबुक गहाळ झाल्यास फी दाखल 10/- रूपये दिल्याशिवाय नवीन पासबुक दिले जाणार नाही.

(4) वर्षअखेर ठेवीवर जमा होणारे व्याज त्या ठेवीदाराच्या कर्ज खात्यात जमा केले जाईल.

(5) ठेवीचे खाते सुरू करताना ठेवीदाराने ठराविक नमुन्यात अर्ज केला पाहिजे व आपल्या सहीचे नमुने दिले पाहिजेत. रक्कम परत घेताना ठेवीदाराने ठराविक नमुन्यात पावती लिहून दिल्याशिवाय व तिच्यावर आपल्या सहीच्या नमुन्याप्रमाणे सही केल्याशिवाय, कोणतीही ठेव परत केली जाणार नाही.

(6) .................. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या आगऊ मंजूरीने ठेवीवरील व्याजाचा दर ठरविला जाईल. अगर जरूरीप्रमाणे त्यात वेळोवेळी बदल केला जाईल.

(7) मुदत भरण्यापूर्वी ठेव परत केली जाणार नाही. अत्यंत निकडीच्या आपल्या परिस्थितीची ठेवीदाराने खात्री करून दिल्यास संचालक मंडळाच्या मर्जीनुसार ठेव परत करता येईल. पण जितका कालावधी ठेव नेईपर्यंत झाला असेल तितक्या कालावधीकरीता संस्थेचा असणारा व्याज दर व आकारुन ठेव परत करता येईल.

(8) ठेवी खात्रीने वेळीच परत करता याव्यात म्हणून तात्काळ पैसा (फ्ल्युईड रिसोर्सेस) हाती यावा अशा तऱ्हेने नियम क्रमांक 41 मधील तरतूदींना अधिन राहून आपल्या भांडवलाची गुंतवणूक संस्थेने केली पाहिजे.

**79. नफा वाटणी :-** प्रत्येक वर्षअखेरीचे हिशोब तयार झाल्यावर संस्थेच्या ठोकळ नफ्यातून अधिनियम कलम क्रमांक 65 व नियम क्रमांक 51 मधील तरतूदींनुसार, निरनिराळया खर्चाच्या वगैरे रक्कमा, अधिनिय कलम क्रमांक 71 प्रमाणे सेवक भविष्य निर्वाह निधीसाठी संस्थेने दिलेली अंशदाने, डेडस्टॉक, यंत्रे, यंत्रसामग्री, इमारती इत्यादी मालांचा टिकाऊपणा विचारात घेऊन त्याच्या किंमतीवर 5 ते 10% पर्यंत आकारलेली झीज, तोटयाच्या रक्कमा, सरकारी शेतसारा व इतर कर भाडे, खंड व इतर खर्च वजा करून संस्थेच्या निव्वळ नफ्याचा आकडा

काढला जाईल व तो नफा लगतच्या पुढील वार्षिक सर्वसाधारण सभेत जाहीर केला जाईल आणि संस्थेच्या पगारी नोकरांना सरकारी आदेशाप्रमाणे रक्कम बोनस म्हणून देण्यात येईल.

80. **नफा विभागणी :-** अधिनियम कलम 64 ते 69 व नियम 50 ते 52 व 53, 55 मधील तरतूदींना अधिन राहून निव्वळ नफ्याची विभागणी पुढील बाबींवर केली जाईल.

1) कमीत कमी 25% गंगाजळीकरिता.

2) जास्तीत जास्त *15%* दराने लाभांश वाटण्याकरिता.

3) नियम 53 अन्वये द्यावयाच्या शिक्षणनिधीकरिता.

4) भाग भांडवलाच्या 2% नियम 52 प्रमाणे उभारावयाच्या अधिलाभांश समकरण निधीकरिता.

5) भांडवलाच्या 2% नियम 52 प्रमाणे उभारावयाच्या लाभांश समकरण निधीकरिता.

6) नफ्याच्या 5 टक्क्यापर्यंत यंत्र, यंत्रसामग्री, विजेच्या मोटारी, औजारे, इत्यारे इत्यादीच्या झीज निधीकरिता.

7) नफ्याच्या 20% अधिनियम कलम 99 प्रमाणे सार्वजनिक धर्मादाय अशा प्रकारच्या कामाकरिता.

81. लाभांश व अधिलाभांश समकरण निधीचा उपयोग अनुक्रमे लाभांश व अधिलाभांश वाटण्याकडे केला जाईल वरील बाबींवर शिल्लक राहिलेला नफा पुढील बाबीवर विभागता येईल.

1) शिल्लक नफ्याच्या 20% पर्यंत संस्थेच्या पगारी कर्मचाऱ्यांना व कामगारांना जास्तीत जास्त 1 महिन्याच्या एकूण पगाराइतका अधिलाभांश वाटण्याकरिता.

2) शिल्लक नफ्याच्या 15% पर्यंत संस्थेच्या सदस्यांचे शिक्षण, त्यांची सुसंस्कृतता, गरिबांचे शिक्षण व त्यांना मदत, वैद्यकीय मदत व सार्वजनिक उपयुक्त बाबींचा प्रसार, यांचा समावेश असलेल्या कोणत्याही सहकारी अगर धर्मादाय बाबीकरिता.

3) शिल्लक नफ्याच्या 20% पर्यंत इमारत निधीकरिता.

4) शिल्लक नफ्याच्या 20 टक्क्यापर्यंत विशेष अडचणीच्या राखीव निधीकरिता (स्पेशल इमर्जन्सी रिझर्व्ह फंडाकरिता.)

विभागून शिल्लक राहिलेला नफा पुढील वर्षाच्या नफ्यात मिळविण्याकरिता पुढे ओढला जाईल.

82. नियम 53 मधील तरतूदीनुसार संस्थेने शासन जाहीर करील अशा संघीय संस्थेच्या शिक्षणनिधीकरिता अंशदानाची (वर्गणीची)रक्कम भरल्याशिवाय तिला लाभांश वाटता येणार

नाही.

84. अधिनियम कलम 66 च्या पोट कलम (2) मध्ये नमूद केलेली रक्कम, सर्व प्रवेश फी, विशिष्ट कामाकरिता दिलेल्या देणग्या शिवाय इतर देणग्यां शिवाय, इतर देणग्यांच्या रक्कमा, दंडाचे व्याज व जप्त केलेल्या भागांच्या राखीव निधीत सामील केल्या जातील, अधिनियम कलम क्रमांक 66, 67 व नियम क्रमांक 54 मधील तरतूदींना अनुसरून राखीव निधीची गुंतवणूक अगर ठेवणूक ठेवली जाईल.

85. राखीव निधी व्यतिरिक्त इतर निधींशी गुंतवणूक अगर ठेवणूक अधियिम कलम 70 व नियम 55 मधील तरतूदींना अनुसरून केली जाईल.

86. व्यवस्थापनाकडे संस्थेची 300/- रूपये पर्यंतची शिल्लक ठेवता येईल. त्यापेक्षा जास्त शिल्लक जमली असल्यास, जमल्यापासून 3 दिवसांच्या आत (सार्वजनिक सुट्टयांचे दिवस वगळून)ती जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत अगर जवळच्या तिच्या शाखेत भरली पाहिजे व ती भरण्याची जबाबदारी व्यवस्थापकावर व समितीवर राहील. या उपविधीचे उल्लंघन करून संस्थेस नुकसान पोहोचल्यास व्यवस्थापक व संस्थेच्या समितीचे सदस्य स्वत: जातीने जबाबदार धरले जातील.

87. संस्थेचे रोखे, तिच्या हिशेबाचे पुस्तके व कागदपत्रे व्यवस्थापकाच्या ताब्यात राहतील व ती सांभाळण्याची जबाबदारी त्याच्यावर राहील.

88. नियम 65 मध्ये नमूद केलेली व निबंधक यांनी ठरविलेली व समितीस आवश्यक वाटतील अशी हिशेबाची पुस्तके व कागदपत्रे संस्थेने ठेवली पाहिजेत. त्या पुस्तकावर कागदपत्रावर जरूर तेथे व कीर्दीवर दररोजच्या व्यवहाराच्या शेवटी सभापतीने व व्यवस्थापकाने सहया केल्या पाहिजेत. कीर्दीवर त्यांनी सहया न केल्यास संस्थेला त्यांच्याविरूध्द जरूर ती कारवाई करता येईल व कीर्दीत लिहिलेल्या पण सहया न केलेल्या व्यवहारांची तिला कसून चौकशी करता येईल. अध्यक्ष व व्यवस्थापक यांनी संस्थेच्या कागदपत्रांच्या असल्यास त्या करण्यास संस्थेस अधिकार देता येईल.

89.**अ)** आलेल्या रक्कमांच्या ठराविक नमुन्यातील जमेच्या पावत्या व्यवस्थापकाने सहया करून दिल्या पाहिजेत.

ब) पासबुके फक्त सदस्यांना देण्यात येतील. त्यात सदस्यांकडून आलेल्या व त्यांच्या नांवे खर्ची टाकलेल्या रक्कमांच्या नोंदी केल्या जातील व त्या प्रत्येक नोंदीच्या खरेपणाबद्दल व्यवस्थापकाने सही केली पाहिजे. त्या सदस्यांची पासबुके नेहमी लिहून पूर्ण भरली असली पाहिजेत.

क) प्रत्येक वर्षअखेरीस ठेवीदारांना त्याच्या खात्यातील बाक्या लेखी कळविल्या पाहिजेत व

त्या बरोबर आहेत किंवा कसे याबद्दल त्यांच्याकडून लेखी पत्रे मागविली पाहिजेत.

91. संस्थेच्या कोणत्याही सभासदांस अधिनियम कलम 32 मधील तरतूदीनुसार व त्यात नमूद केलेली संस्थेची पुस्तके पाहता येतील अगर नियम 27 मधील व्यवस्थापक समितीने ठरविलेली फी तरतूदीनुसार त्यांच्या नकला त्यास देता येतील. तसेच सदस्याला त्याने संस्थेशी केलेल्या व्यवहाराची माहिती मागता येईल.

92. संस्थेच्या उपविधीत बदल करणे, एखादा उपविधी रद्द करणे किंवा नवीन घालणे असल्यास, अधिनियम कलम 13 व नियम 12 मधील तरतूदी अनुसरल्या पाहिजेत. त्याकरिता भरलेल्या सर्वसाधारण सभेस हजर असणाऱ्या व मत देणाऱ्या सदस्याच्या 2/3 संख्येने त्या बदलासंबंधीचा ठराव पास केला पाहिजे. त्या सभेची नोटीस सभेच्या तारखेपूर्वी निदान 15 दिवस अगोदर सर्व सदस्यांना दिली पाहिजे. कोणता उपविधी कसा बदलावयाचा, कोणता नवीन घालावयाचा अगर रद्द करावयाचा हे त्या नोटीशीत स्पष्टपणे लिहिले पाहिजे. निबंधक यांच्याकडून दुरूस्तीची पसंती व नोंद होईपर्यंत दुरूस्त केलेला कोणताही उपविधी अंमलात येणार नाही.

93. संस्थेचा व्यवहार योग्य रीतीने चालावा म्हणून अधिनियम, नियम व उपविधी यांना अनुसरून दुय्यम विनियम करण्याचा संचालक मंडळास अधिकार आहे. अशा विनियमांची नोंद संचालक मंडळा वृत्तांत नोंदवहीत केला पाहिजे. सर्वसाधारण सभेने मान्य केल्यास व निबंधक यांनी मंजूरी दिल्यावरच ते विनियम अंमलात येतील.

94. सभासदांना द्यावयाची नोटीस पोस्टाने अगर अन्य रितीने पाठविली जाईल. सभासदांस नोटीस दिली पाहिजे असे या उपविधीत जेथे नमूद केले असेल तेथे सदस्यांच्या नेहमीच्या राहत्या घरी अशी नोटीस दिली म्हणजे त्या नोटीसीची योग्य बजावणी झाली असे समजले जाईल.

95. नियम 36 प्रमाणे संस्थेचा एक समाईक शिक्का (सील) असेल व तो व्यवस्थापकाच्या ताब्यात राहील. शिक्क्याचा वापर फक्त समितीच्या ठरावाच्या अधिकारान्वये होईल आणि संस्थेतर्फे करूनदेण्यात येणाऱ्या व हा शिक्का मारलेल्या कागदपत्रावर समितीचा सभापती, तिचा सदस्य व व्यवस्थापक यांनी सहया केल्या पाहिजेत.

प्रवर्तकांची / संचालक मंडळ सभासदांची नांवे त्यांच्या सहया

1) ____________________ 1) ____________________

2) ____________________ 2) ____________________

3) ____________________ 3) ____________________

4) ______________________________ 4) _______________________

5) ______________________________ 5) _______________________

6) ______________________________ 6) _______________________

7) ______________________________ 7) _______________________

8) ______________________________ 8) _______________________

9) ______________________________ 9) _______________________

10) ____________________________ 10) ______________________

सुचना : 1) नवीन संस्था नोंदताना 'प्रवर्तकांची' हा शब्द ठेवावा व नोंदलेल्या संस्थेला हे उपविधी स्वीकारताना 'प्रवर्तकाची' हा शब्द खोडावा.

**परिशिष्ट - 1**

**करारपत्र**

__________________________ सहकारी ________________________

पाणी पुरवठा संस्था मर्यादित __________________________________

तालुका __________________ जिल्हा ________________________________

यांना मी (संपूर्ण नांव) __________________________ राहणार _________________________ ता. _____________ जि. _________वय वर्षे

या लेखाने करार पत्र करून देतो ऐसेजे,

1) वर निर्दिष्ट केलेल्या सहकारी पाणीपुरवठा संस्थेचा सदस्य होण्याकरिता मी वेगळा अर्ज केला असून संस्थेच्या पाणीपुरवठयाच्या योजनेत _______________ या गावात माझ्या मालकीच्या व खंडाच्या खाली वर्णन केलेल्या जमिनी भिजविण्याचे मी पत्करीत आहे.

| भूमापन क्रमांक | क्षेत्र | आकार | जमीन खंडाची की मालकीची | चतु:सिमा | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | हे.आर | रु.पैसे | | पूर्व | पश्चिम | दक्षिण | उत्तर |
| 1 | 2/3 | 4/5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 |

2) यापैकी कोणत्याही जमिनीमधून संस्थेला तिच्या पाणीपुरवठा योजनेचा नकाशा व आराखडयाप्रमाणे चर काढणे, पाट काढणे , पाईपलाईन्स टाकणे अगर तत्सम कामे करण्यास करारपत्राने, संस्थेस मी अधिकार देत आहे आणि यापैकी कोणत्याही जमिनीत संस्थेच्या पाणीपुरवठयाच्या या योजनेकरिता अगर तशाच अन्य कारणासाठी संस्था ठरविल अशा योग्य मोबदल्यावर व अटीवर संस्थेला भाडयाने, रजिस्टर्ड खंडाने अगर विकत देण्याचे मी पत्करीत आहे.

3) संस्थेच्या उपविधी क्रमांक 4(2) मध्ये नमूद केल्याप्रमाणे संस्थेला सरकारकडून जिल्हा मध्यवर्ती सहकारी अगर भू- विकास बँकेकडून अगर इतरांकडून भांडवल उभारण्याकरीता माझ्या मालकिचा व खंडाच्या जमिनी सरकारला अगर बँकेला अगर इतरांना तारण देण्यास या करारपत्राने, संस्थेस मी अधिकार देत आहे .

4) पाणीपुरवठयासंबंधी संस्थेची समिती अगर अधिकारी वेळोवेळी जी बंधने घालतील व आदेश देतील ते सर्व पाळण्याचे मी या करारपत्राने पत्करीत आहे.

5)पाणीपुरवठयाच्या योजनेकरिता माझ्यावर बसेल तो भांडवली व चालू खर्च माझ्या नावावर कर्ज म्हणून नावे मांडण्यास या करारपत्राने संस्थेस अधिकार देत आहे. ती रक्कम व्याजासह मी परत फेडीन. माझ्या नावावर मांडलेल्या रक्कमांचे कर्जरोखे व पावत्या वेळोवेळी लागतील तसे करून देईन.

6)अन्नधान्ये व जनावराकरिता चारा यांच्या वाढीस प्रोत्साहन देण्यासाठी संस्था ज्या योजना व पिकांचा कार्यक्रम आखील त्या योजना व तो कार्यक्रम कसोशीने पार पाडण्याचे मी पत्करीतआहे.

7)माझ्या जमीनी सुधारण्यावर संस्थेचा जो योग्य खर्च होईल त्याची योग्य भरपाई मी संस्थेकडून राजीनामा देऊन अगर अन्य रीतीने कमी होईन तेंव्हा करण्याचे मी पत्करीत आहे.तसेच संस्थेने माझ्या जमिनीच्या तारणावर काढलेल्या कर्जाचा बोजा अगर अन्य भार हा,

ते कर्ज फिटेपर्यंत मी संस्थेतून काम झाल्यावरही कायम राहील, व त्यास मी जबाबदार राहीन.

8) या करारपत्रात नमूद केलेल्या शर्तीप्रमाणे मी वागलो नाही तर त्याच्या परिणामास मी जबाबदार राहीन. तसेच त्या शर्तीची पूर्तता करून घेण्याच्या कामी संस्थेस येणाऱ्या खर्चाची वसुली करण्यास व त्या कामी जरूर ती कारवाई करण्यास संस्थेस संपूर्ण अधिकार राहील. हे करारपत्र मी स्वखुशीने व स्वसंतोषाने लिहून दिले असे.

दिनांक:-

स्थळ:- करारपत्र करून देणाऱ्याची सही

साक्षीदार

1) नांव----------------- सही ---------------------------

2) नांव --------------------- सही ---------------------------

परिशिष्ट "2"

------------ सहकारी ----------------- संस्थेच्या पाणीपुरवठा योजनेत

भिजवावयाच्या जमिनीची माहिती

| क्रमांक | जमीन असणा-या मालकाचे नाव | ताब्यात जमीन असणा-या कुळाचे नाव | रेव्हीन्यु सर्व्हे नंबर अगर गट नंबर | जमिनीचे क्षेत्र | | सरकारी सारा रू.पै. | खंड रूपये | असलेला मालक/ खंडकरी योजनेत सामील झाला किंवा नाही | शेरा | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | हेक्टर आर | आर गुंठे | | | | | |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 |
| | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | |

| अ.क्रमांक | जमिनीच्या मालकाचे नाव | कुळे असल्यास त्यांचे / त्यांची नावे | ज्यांच्या ताब्यात जमिनी आहेत अशा मालकाने खंडकऱ्याने योजनेस लेखी कबुली दिली काय? | | रेव्हीन्यु सर्व्हे नंबर अगर गट नंबर | क्षेत्रफळ | | सरकारीआकार | | कबुली देणाऱ्या मालकाची/खंडकऱ्याची सही | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | मालकाने | खंडकऱ्याने | | हेक्टर एकर | आर गुंठे | रूपये | पैसे | | |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 |

--------------------------------(सूचना: कॉलम नंबर 2, 3, 6, 7, 8, 9 आणि 10 यांचे उतारे रेकॉर्ड ऑफ राईटस मधून घेऊन भरावेत)

दिनांक

मुख्य प्रवर्तकाची सही

**<u>पाणीपुरवठा सहकारी संस्था</u>**

**<u>उपविधी</u>**